# महाराष्ट्र मिशन

MAHARASHTRA MISSION

मराठी साप्ताहिक Title Code : MAHMAR51992

Editor - Narsing Digambar Kamble • Vol-2 • Issue 8 • Pune • Tuesedy 20 February 2024 to Monday 26 February 2024 • Pages - 8 • Rs. 2/-


## आमदारांनी मराठ्यांच्या बाजूने बोलावं अन्यथा..

### विशेष अधिवेशनाआधी जरांगे पाटलांचा इशारा



**जालना :** मराठा आरक्षणाच्या निर्णयासंदर्भात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. आज मराठा आरक्षणासाठी एक दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर केला जाणार आहे. आज मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर झाल्यास मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळेल. याच पार्श्वभूमीवर काल पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी महत्वाचे विधान केले आहे.

ओबीसी समाजला धक्का न लागता मराठा आरक्षण मिळेल. मराठा आरक्षणाने ओबीस आरक्षणाला धक्का लागण्याचा प्रश्नच येत नाही. उद्या जो कायदा होणार आहे त्याचं कौतुक, आनंद होणारच आहे. मात्र सरकारला सगे सोयऱ्यांबाबत भूमिका मांडावीच लागेल, फक्त अधिसुचना काढून चालणार नाही, त्याची अंमलबजावणी करावी लागेल, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

उद्या अधिवेशनात मराठा आमदारांनी आरक्षणाच्या बाजूने बोलावं. सगे सोयऱ्यांच्याबाबत एकमताने आवाज उठवावा. मंत्री महोदयांनी आणि आमदारांनी राजकारण सोडून स्पष्ट आरक्षण मागावे. (पान ६ वर)

# गडकोट, किल्ले हा आपला ठेवा; तो जपण्याचे काम करु : मुख्यमंत्री

### किल्ले शिवनेरी येथे शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**पुणे (राकेश लोंढे) - छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकोट किल्ले हा आपला ठेवा असून तो जपण्याचा प्रयत्न नक्की करु. पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित विविध २० पर्यटन स्थळे विकसित होत आहेत, त्यात किल्ले रायगडाप्रमाणेच शिवनेरीचाही विकास करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.**



कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, खासदार अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी वास्तुकला, अभियांत्रिकी, किल्ल्यावरील प्रत्येक थेंब पाण्याचा उपयोग करून घेण्याची दूरदृष्टी त्या काळी दाखवली. शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शौर्य, त्याग, समर्पण आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. ते सर्वव्यापी होते आणि त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते युगपुरुष, युगप्रवर्तक आणि रयतेचे राजे होते. अठरापगड जातीचे, धर्माचे लोक त्यांनी एकत्र आणले. प्रजेच्या दुःखापुढे, कल्याणापुढे स्वतःचे दुःख, आराम कवडीमोल मानला. त्यांनी तलवार हाती घेतली पण निष्पापांच्या रक्ताने रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या तलवारीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो. ते केवळ व्यक्ती नाही तर विचार होते असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. शिवरायांकडील एक तरी गुण आपण सर्वांनी घेतल्यास शिवजयंती साजरी करताना त्यांना हेच खरे अभिवादन ठरेल. (पान ६ वर)

## जैन मूनी संत आचार्य विद्यासागर महाराजांचे निधन, ७७ वर्षी घेतला अखेरचा श्वास



**रायपूर :** जैन धर्मियांचे दिगंबर पंथियांचे संत आचार्य विद्यासागर महाराज यांचे निधन झाले आहे. मध्यरात्री २ वाजून ३५ मिनीटांनी छत्तीसगड येथील डोंगरगड येथे त्यांचे वृद्धआपकाळाने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते.ही बातमी जैन समाजाच्या लोकांना समजताच लोकांची गर्दी उसळली. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.जैन मुनी आचार्य विद्यासागर महाराज यांनी समाधी घेतली. देह सोडण्याच्या अवघ्या तीन दिवस आधी आचार्य श्री विद्या सागर यांनी आचार्य पदाचा त्याग केला आणि तीन दिवसांपासून त्यांनी अन्न त्याग करुन अखंड मौन धारण केले होते. ज्यानंतर त्यांनी अखेरचा श्वास घेतला. याआधी, ६ फेब्रुवारी रोजी, त्यांनी निर्यापक श्रमण मुनिश्री योगसागर यांच्याशी बोलून संघाशी संबंधित कार्यातुन निवृत्ती घेतली आणि त्याच दिवशी त्यांनी आचार्य पदाचा राजीनामा दिला. आचार्य श्रींनी ८ मार्च १९८० रोजी छतरपूर येथील द्रोणगिरी तीर्थ येथे मुनी श्री समय सागर महाराज यांना आपल्या जीवनातील पहिली दीक्षा दिली. यानंतर आचार्य श्रींनी जैन संतांना अनेकवेळा दीक्षा दिली आणि त्यांना धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली. आचार्य श्री हे देशातील एकमेव जैन भिक्षू होते ज्यांनी आतापर्यंत अनेकांना दीक्षा दिली आहे. आचार्य श्रींनी २८ नोव्हेंबर २०१८ रोजी उत्तर प्रदेशातील ललितपुर येथे शेवटची दीक्षा दिली.मिळालेल्या माहितीनुसार, आचार्य विद्यासागर महाराज यांचा जन्म १० ऑक्टोबर १९४६ रोजी कर्नाटक येथील बेळगावातील सद्लगा गावात शरद पोर्णिमेच्या दिवशी झाला होता. आचार्य यांच्याकडून दीक्षा घेणाऱ्यांमध्ये त्यांचे भाऊ मुनी श्री समय सागर आणि मुनि श्री योग सागर तसेच बहिण शांता आणि सुवर्णा यांचाही समावेश होता. छत्तीसगड दौऱ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डोंगरगड गाठले आणि जैन साधू विद्यासागर महाराज यांचे दर्शन घेतलं होतं.

## सार्वजनिक आरोग्य विभागाची १९ फेब्रुवारी ते ४ मार्च दरम्यान विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम

### पंधरवड्यात एक लाख शस्त्रक्रियेचे आरोग्य विभागाचे उद्दिष्ट

**मुंबई (गणेश हजारे) :** राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षिणता नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत दि.१९ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२४ दरम्यान राज्यभरात विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत १ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून हा विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.



शासकीय रुग्णालय, मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्था रुग्णालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जाणार असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.या मोहिमेंतर्गत १ लाख शस्त्रक्रिया करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हानिहाय नियोजन केले असून संबंधित आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. केंद्र शासनामार्फत 'राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान' ही विशेष मोहीम जून, २०२२ पासून राबविण्यात येत आहे. या मोहिमेत ५० किंवा त्याहून अधिक वयाच्या लोकांमध्ये अंधत्व आणि एसव्हीआय कारणीभुत असलेल्या मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा अनुशेष पूर्णपणे भरून काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत २०२२ ते २०२५ या तीन वर्षात २३ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आहे. आरोग्य विभागाच्या या मोहिमेमुळे नागरिकांना मोफत शस्त्रक्रियेचा लाभ घेता येणार आहे.सन २०२२-२३ मध्ये राज्यात मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे ११२.५१ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे व २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिसेंबर, २०२३ पर्यंत एकुण उद्दिष्टाच्या ६७.३० टक्के मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता दि.१९ फेब्रुवारी ते दि.०४ मार्च २०२४ या कालावधीत जिल्हास्तरावर 'विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येणार आहे. या उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासकीय आरोग्य संस्थांसह, अशासकीय स्वयंसेवी संस्था तसेच खासगी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. याविषयी किंवा इतर आरोग्यविषयक सल्ला घेण्यासाठी नागरिकांनी १०४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## बारामतीत सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे

### रथाद्वारे प्रचार, बारामतीत नणंद-भावजय रंगणार सामना

**बारामती :** देशातील सर्वच पक्षांनी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. उमेदवारांची नावे अद्याप जाहीर झाली नसली तरी काही ठिकाणी उमेदवार निश्चित झाले आहेत. त्याअंतर्गत ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.बारामती लोकसभा मतदारसंघ हा महाराष्ट्रातील हायप्रोफाईल जागा मानला जातो. बारामतीतील लढत पवार कुटुंबीयांमध्येच होणार हे जवळपास निश्चित झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे पुन्हा निवडणूक लढवणार आहेत. तसेच शरद पवार यांचे पुतणे आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला ही जागा मिळणार आहे. अजित पवार गटाकडून उमेदवार कोण? याची पुष्टी झालेली दिसते.


बारामतीतून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. सध्या शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे बारामतीच्या खासदार आहेत. सुळे या अजित पवार यांच्या चुलत बहिणी आहेत. बारामती मतदारसंघातून त्या तीन वेळा लोकसभेवर निवडून आल्या आहेत. त्यांच्या विरोधात त्यांच्या स्वतःच्या वहिनी आणि अजित पवार यांच्या पत्नीने निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. सुनेत्रा पवार यांनी



आजपर्यंत एकही निवडणूक लढलेली नाही. पर्यावरण आणि महिलांशी संबंधित उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे निकटवर्तीय वीरधवल जगदाळे यांनी सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याची मागणी केली होती.गेल्या वर्षी जुलैमध्ये अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात बंडखोरी केली होती आणि त्यांचे काका शरद पवार यांना सोडून एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये सामील झाले होते. भाजप-शिंदे सरकारमध्ये त्यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाली. अजित पवारांसोबतच अनेक आमदारांनीही पक्षनिष्ठा बदलली होती. गुरुवारीच विधानसभा अध्यक्षांनी अजित पवार यांच्या गटातील राष्ट्रवादी काँग्रेस हीच खरी राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचे म्हटले होते. याचा शरद पवारांना मोठा फटका बसला, जरी शरद पवार गटाच्या नेत्यांनी सभापतींच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले.दुसरीकडे बारामतीत अजित पवार गटाची बुथ कमिटीची बैठक झाली. या सभेत बोलताना अजित पवार भावूक झाले. कुटुंबात एकटे पडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना त्यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता जोरदार टीका केली. त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर कडाडून टीका करत चांगल्या खासदाराची पदवी मिळाली म्हणजे काम झाले असे होत नाही, त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. बारामतीत उमेदवार कोण? असे त्यांनी स्पष्ट केले. बारामतीत चार-पाच वेळा खासदार होणारा उमेदवार असेल. तुमचा उमेदवार नवीन असेल. ते पहिल्यांदाच खासदार होणार आहेत. पण निवडून आलेला खासदार जास्त काम करणार आहे. मी पहिल्यांदाच खासदार म्हणून उभे असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. त्यामुळे बारामतीतून सुनेत्रा पवार उमेदवारी करणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले होते.

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा ! केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी हटवली

**नवी दिल्ली :** देशात कांद्याच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर प्रतिबंध आणला होता. हा निर्णय ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू राहणार होता मात्र, अंतिम मुदतीपूर्वी हे प्रतिबंध काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेत आज सकाळी झालेल्या बैठकीत, कांद्याच्या निर्यातीवर घातलेली बंदी काढण्याचा निर्णय घेतला आहे. सोबतच, मंत्रीमंडळाने ३ लाख मेट्रीक टन कांदा निर्यात करण्यास मंजुरी दिली आहे. गुजरात आणि महाराष्ट्राकडे कांद्याचा पुरेसा साठा आहे. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी कांद्याच्या साठ्याविषयी गृहमंत्र्यांना माहिती दिल्यानंतर, निर्यातीवरील बंदी काढण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच, कांदा आणि इतर भाज्यांच्या किमतीत झालेली घसरण हेदखील निर्यातबंदी काढण्यामागचे महत्त्वाचे कारण मानले जात आहे.



निर्यातबंदी काढल्यानंतर, ३ लाख मेट्रीक टन कांद्याच्या निर्यातीला तातडीने मंजुरी देण्यात आली आहे. शिवाय, भारत बांग्लादेशला ५० हजार टन कांद्याची निर्यात करणार आहे. डिसेंबर २०२३ मध्ये, कांद्यांच्या किमतीत वाढ होऊन ती १०० रुपये किलोपर्यंत गेली होती. त्यानंतरच, ८ डिसेंबर रोजी निर्यातबंदीचा निर्णय घेण्यात आला होता. महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे कांदा उत्पादक राज्य आहे. आता कांद्याच्या किमती नियंत्रणात असून, सरकारच्या धोरणात्मक निर्णयांमुळे कांदा उत्पादक आणि ग्राहक दोहोंमध्येही समाधानाचे वातावरण आहे.

### कोल्हापूर प्रेस क्लबच्या वार्षिक पुरस्कारांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

## पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी समिती गठित करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**कोल्हापूर :** पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. कोणत्याही प्रश्नाला, समस्येला वाचा फोडण्याबरोबरच समाजाला आरसा दाखवण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकार करतात. पत्रकारांनी मागणी केलेले प्रश्न मार्गी लावण्यात येतील, पत्रकार सन्मान योजनेचा लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती गठित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. शासन चालवित असताना माध्यमातील अनेक बातम्यांमधून वेगवेगळ्या चुका लक्षात येतात व त्या चुका दुरुस्त करून अधिक चांगल्या पध्दतीने काम करता येत, असे प्रतिपादनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर येथे केले.कोल्हापूर प्रेसक्लबच्या वतीने आयोजित वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत केशवराव भोसले नाट्यगृहात पार पडला. या कार्यक्रमाला राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार राजेंद्र पाटील - यड्रावकर, प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, कार्याध्यक्ष दिलीप भिसे, कोल्हापूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुखदेव गिरी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, फोटोग्राफर, कॅमेरामन आदी उपस्थित होते.उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकार, छायाचित्रकार, कॅमेरामन व अन्य (पान ६ वर)




### पत्रकार पुरस्काराचे मानकरी

- उत्कृष्ट पत्रकार - संतोष पाटील, तरुण भारत
- उत्कृष्ट छायाचित्रकार - बी डी चेचर, सकाळ
- उत्कृष्ट पत्रकार टीव्ही - विजय केसरकर, एबीपी माझा
- उत्कृष्ट कॅमेरामन टीव्ही - निलेश शेवाळे, एबीपी माझा

### व्हाईट आर्मीकडून मुख्यमंत्री महोदयांना देवदूत पुरस्कार प्रदान

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजवर केलेल्या सामाजिक कामांसाठी व आपत्ती दरम्यान केलेल्या मदतीसाठी व्हाईट आर्मी या संस्थेने त्यांना देवदूत पुरस्कार देवून सन्मानित केले.
- हा पुरस्कार व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे यांच्या हस्ते देण्यात आला.

## अरविंद केजरीवाल यांचा ईडीसमोर हजर होण्यास नकार



**नवी दिल्ली :** दिल्लीच्या कथित दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अडकलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज पुन्हा एकदा अंमलबजावणी संचालनालयासमोर (ईडी) हजर होण्यास नकार दिला आहे. केजरीवाल यांनी एक-दोनदा नव्हे तर सहाव्यांदा असे केले आहे. ईडीच्या नोटीसवरही अरविंद केजरीवाल आज हजर होणार नाहीत, असे आम आदमी पार्टीने (आप) म्हटले आहे.

ईडीच्या नोटिसा बेकायदेशीर आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे आपने म्हटले आहे. 'आप'च्या म्हणण्यानुसार, समन्सच्या वैधतेचा मुद्दाही कोर्टात प्रलंबित आहे. ईडी स्वतः कोर्टात गेली होती, त्यामुळे आता पुन्हा पुन्हा समन्स पाठवण्याऐवजी कोर्टाच्या निर्णयाची वाट पाहावी, असे 'आप'ने म्हटले आहे.१४ फेब्रुवारीला ईडीने केजरीवाल यांना सहावे समन्स पाठवले होते आणि त्यांना १९ फेब्रुवारीला ईडीसमोर हजर राहण्यास सांगितले होते. यापूर्वी केजरीवाल यांना ईडीने या वर्षी ३ जानेवारी, १८ जानेवारी आणि २ फेब्रुवारी आणि गेल्या वर्षी २०२३ मध्ये २ नोव्हेंबर आणि २१ डिसेंबर रोजी चौकशीसाठी बोलावले होते. मुख्यमंत्र्यांनी या नोटीस बेकायदेशीर ठरवून त्याकडे नेहमीच दुर्लक्ष केले आहे.

उल्लेखनीय आहे की, दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने या प्रकरणात पूर्वी पाठवलेल्या समन्सकडे दुर्लक्ष केल्याबद्दल (पान ६ वर)

## संपादकीय

# राजकारणातून 'लेस' होणारं 'सीड'

'पेराल ते उगवेल' किंवा 'जे तुम्ही लोकांना द्याल तेच तुम्हाला परत मिळेल' असे म्हणतात ते काही खोटे नाही. एकेकाळी गोपीनाथ मुंडेंच्या कुटुंबात फाटाफूट करुन धनंजय मुंडे सारख्या पुतण्याला फोडणाऱ्या शरद पवार साहेबांनी पूर्वी त्यांनी जे पेरलं तेच उगवले आहे. अशा फोडाफोडीच्या राजकारणात हयात गेलेले नेते या महाराष्ट्राच्या भूमीत मोजके.. आता सुप्रिया सुळे हे नाव पुन्हा दिल्लीच्या राजकारणात जाण्याची शक्यता कमी झाल्याने साहेबांच्या गोटात भलतीच अस्वस्थता आहे. राजकारणात तडजोडी काही नवीन नाहीत आणि त्या तडजोडीचं रूपांतर चांगल्या मित्रपक्षाच्या स्वरूपात अनेकदा होत असते. पण तडजोडीचे राजकारण काहीसं वेगळंच आहे. एकाच वेळी अनेक राजकीय पक्षांना झुलवत ठेऊन कोण्या तिसऱ्या सोबत सत्तेत सामील होण्याची त्यांची सवय जुनीच आहे.अगदी अलीकडेच निवडणूक आयोगानं अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाच खरी राष्ट्रवादी काँग्रेस मानले आहे. अजित पवारांच्या दादा गटाला राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडणूक चिन्ह देण्याचे आदेशही निवडणूक आयोगानं दिले. पक्षाची घटना आणि बहुमताच्या आधारे निवडणूक आयोगाने निर्णय दिला. नुकताच महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनीही दादा गटाच्या बाजूने निकाल दिला. महाराष्ट्रात याना त्या कारणानं नेहमीच चर्चेत असलेल्या काही मोजक्याच नेत्यांपैकी एक म्हणजे अजितदादा. त्यांच्यावर प्रसिद्धी माध्यमांतून व विरोधकांकडून नेहमीच कडाडून टीका होते.अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरात भरपूर विकास कामे करून शहराचा कायापालट केल, हे विरोधक देखील मान्य करतात. राष्ट्रवादी कार्यकर्ते आपण दादांसारख्या तडफदार, प्रश्नाचा फडशा पाडणाऱ्या माणसासोबत जाण्याची शक्यता जास्त आहे कारण दादा हा माणूस वैचारिक बडबड किंवा राष्ट्रीय सिध्दांत असल्या गोष्टींच्या पार जाऊन प्रश्न आणि समस्या यांना भिडणारा नेता आहे. कदाचित म्हणूनच थोरल्या पवारांपेक्षा या धाकट्या पवारांचं नेतृत्व लोकांनी स्वीकारलं आहे.आगामी लोकसभा निवडणुकीत बारामतीच्या जागेवर सुप्रिया सदानंद सुळे यांच्या विरोधात अजित पवार आपली पत्नी सुनेत्रा पवार यांच्या रुपाने आपला उमेदवार उभा करू शकतात, अशी चर्चा झडते आहे. सुनेत्रा यांचा प्रचारक चित्ररथ बारामतीत फिरुही लागला आहे. नणंद भावजय यांची ही राजकीय कुस्ती केवळ रंगदारच होईल असे नाही तर देशाचे लक्ष वेधून घेईल.अशा विचित्र राजकीय वातावरणात शरद पवारांचा नुकताच बारामती दौरा झाला. बारामतीची जागा परंपरागतपणे शरद पवारांच्या राजकारणाचा बालेकिल्ला. आधी शरद पवार आणि नंतर त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे बारामतीतून खासदार आहेत. पण अगदी तरुण वयात अजितदादा सुध्दा बारामतीचे खासदार होते. त्यामुळे त्यांची उमेदवार 'नवखी' असली तरी दादांच्या सुनेत्र वलयामुळे भरपूर मते खेचू शकते. शिवाय बारामती लोकसभा मतदारसंघात खंडीभर प्रश्न आहेत. दादा म्हणतात त्याप्रमाणे सेल्फी काढून किंवा संसदेत भाषणबाजी करुन ते सुटत नाहीत. सुप्रिया सुळेंच्या संसदीय कार्यपद्धतीची उडवली गेलेली खिल्ली त्यांना चांगलीच झोंबलेली दिसते.बऱ्याच दिवसांनी शरद पवार बारामतीत पोहोचले. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी यांनी पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह गमावल्याची व्यथा मांडली. ज्याने पक्ष काढला त्याची पक्षातून हकालपट्टी झाल्याची सल त्यांनी बोलून दाखवली. कायद्यानुसार हा निर्णय योग्य नाही. आम्ही त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचेही पवार म्हणतात. आधी ते आम्ही कोर्टात जाणार नाही तर जनतेच्या न्यायालयात जाऊ असं हेच साहेब म्हणाले होते.महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतल्या २५ हजार कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी सप्टेंबर २०१९ मध्ये ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार आणि तत्कालीन विरोधी पक्ष नेते अजित पवार यांच्यावर 'ईडी'ने गुन्हा दाखल केला होता. सोबतच विजयसिंह मोहिते पाटील, हसन मुश्रीफ, शिवसेनेचे आनंदराव अडसूळ, काँग्रेसचे दिलीप देशमुख, मधुकर चव्हाण आदी ७६ नेत्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला होता.याबाबत 'ईडी'ने अधिकृत नोटीस देखील काढली. विधानसभा निवडणुकीच्या आधी ही खेळी खेळली गेली.त्यानंतर संतप्त साहेबांनी स्वतःहून चौकशीला येण्याची तयारी दाखवत आक्रमक हालचाली केल्या, मात्र कायदा आणि सुव्यवस्थेचे कारणामुळे चौकशी रद्द झाली. 'ईडी'नं पवार यांना एक ईमेल पाठवला. या ईमेलमध्ये म्हटले होते की, शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी तुमच्या चौकशीची गरज नाही, कदाचित भविष्यातही या चौकशीची गरज पडणार नाही. मात्र त्यानंतरही बरेच दिवस हे प्रकरण बातम्यांमध्ये होते. या चौकशीचे पुढे काय झाले? की ती आता होणारच नाही हे राम जाणे.. ज्याने राजकीय पक्ष काढला तो पक्षातून बाहेर फेकला गेला असे कधीच घडले नाही. एवढेच नाही तर पक्षाचे निवडणूक चिन्हही हिसकावून घेतले. हा निर्णय कायद्यानुसार योग्य नाही. याप्रकरणी आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. पण आम्हाला लोकांपर्यंत पोहोच वाढवायची आहे, असे ते म्हणाले. पण इतकी वर्षे लोकांमध्ये राहूनही या वयात पोहच वाढवण्यासाठी फिरावे लागते याचा अर्थ आपली लोकप्रियता घसरली आहे हे त्यांनी ओळखले आहे असाच त्याचा अर्थ. या महाराष्ट्र भूमीत एखाद्या नेत्याचा अति गवगवा करणारे कार्यकर्ते आणि पत्रकार कमी नाहीत. महाराष्ट्रातील एका द्राक्षाच्या जातीला 'शरद सीड लेस' असे नाव साहेबप्रेमींनी दिले होते. मोदी भक्त जशा कंड्या पिकवत फिरणं असतात, तसेच शरद पवार प्रेमी महाराष्ट्रात थोडे नाहीत. सीड लेस यांचा अर्थ ज्यात बीज नाही असा .. त्यांनी बीजहीन द्राक्ष जातीला 'शरद सीडलेस ' असं नाव दिलं. हे 'सीड' राजकारणात मात्र 'लेस' होतं आहे.

**संपादक : नरसिंग दिगंबर कांबळे**

## बोधकथा

### उपकार स्मरावे

अज्ञात वासात असताना पांडव एका गरीबाच्या घरी राहिले होते. त्या गावच्या लोकांना बकासुराचा त्रास सुरू झाला होता. त्याला रोज गाडाभर अन्न व एक माणूस एवढे खाद्य पाठवावे लागे. आज माणूस पाठवण्याची पाळी त्या गरिबावर आली. घरातल्या कोणाला पाठवावे ? चर्चा सुरु होती. संकट मोठे होते — पण कुंतीन ठरविले त्या ब्राह्मणाच्या मुलाऐवजी आपल्या भीमाला पाठवावे. पण पाहुण्यावर संकट ढकलणे म्हणजे महान पाप! पण कुंतीने त्यांची समजूत काढली. आपल्या मुलाला काहीही त्रास होणार नाही याची खात्री पटविली अखेरीस भीमानही शब्द खरे करून दाखविले. बकासुराचा वध करून गावावरचे संकट दूर केले. संकटकाली आपल्याला आश्रय देणाऱ्या त्या गरीबाच्या उपकारांचीही फेड केली.

**तात्पर्य: उपकाराची जाण ठेवावी**

# प्रदूषण, अतिक्रमणे, गुन्हेगारी, नागरी सुविधांची वानवा यात गुरफटलेले पुणे शहर

**चांगल्या रस्त्यांचा अभाव, रस्त्यावर ठाण मांडून बसलेले फेरीवाले, वाहतूक कोंडी, अस्वच्छ परिसर आणि अतिक्रमणे यामुळे नागरिक त्रस्त आहेत. रस्ता दुभाजकाच्या दोन्ही ठिकाणी, पादचारी वेगवान बस, टेम्पो, ऑटो, कार आणि दुचाकींमधून जीव धोक्यात घालून दोन्ही बाजूंनी क्रॉस करताना दिसतात. बेशिस्त वाहनचालक आणि सर्वत्र फोफावलेली संघटीत गुन्हेगारी यामुळे सामान्य माणूस त्रस्त आहे. कसब्यासारख्या जुन्या पुण्यात पाणी पुरवठ्याची समस्या गंभीर आहे. उपनगरीय नागरिकांना सुध्दा टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. पुण्यात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि अभूतपूर्व वाढीशी जुळण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे.**



एकेकाळी शांततेसाठी ओळखले जाणाऱ्या जुन्या पुण्यासह उपनगरांमध्ये अनेक नागरी समस्यांमुळे रहिवाशांना नवीन ठिकाणी स्थलांतरित होण्यास प्रवृत्त करणे ही कळीची समस्या आहे. रोजच येणाऱ्या स्थलांतरित लोंढ्यांमुळे नवनव्या झोपडपट्ट्या निर्माण होणे आणि सरकारी जमिनींवर बेकायदेशीर वसाहती उभ्या राहणे हे दुष्टचक्र गेली अनेक दशके कायम आहे.



**श्री. नरसिंग कांबळे**
मुख्य संपादक, महाराष्ट्र मिशन

प्रचंड लोकसंख्या ताणामुळे जलवायू प्रदूषण ही समस्या गेल्या काही वर्षांत निर्माण झाली असून विशेषतः मुळा नदीचे सुधार प्रकल्प गेल्या ३० वर्षांहून अधिक काळापासून वाया गेले आहेत. नदीकाठच्या सुशोभीकरणाचा आणि जलवाहतुकीचा विषय स्वप्नवत आहे. पुणे शहराची अफाट वाढ पुढच्या काळात सर्वच घटकांना त्रासदायक बनणार आहे. सिमेंट काँक्रिटचे जंगल झालेल्या पुण्याची बकालपणाकडे सुरु असून ही अक्राळविक्राळ वाढ रोखण्यासाठी जबाबदार घटकांनी पुढे आले पाहिजे.

चांगल्या रस्त्यांचा अभाव, रस्त्यावर ठाण मांडून बसलेले फेरीवाले, वाहतूक कोंडी, अस्वच्छ परिसर आणि अतिक्रमणे यामुळे नागरिक त्रस्त आहेत. रस्ता दुभाजकाच्या दोन्ही ठिकाणी, पादचारी वेगवान बस, टेम्पो, ऑटो, कार आणि दुचाकींमधून जीव धोक्यात घालून दोन्ही बाजूंनी क्रॉस करताना दिसतात. बेशिस्त वाहनचालक आणि सर्वत्र फोफावलेली संघटीत गुन्हेगारी यामुळे सामान्य माणूस त्रस्त आहे. कसब्यासारख्या जुन्या पुण्यात पाणी पुरवठ्याची समस्या गंभीर आहे. उपनगरीय नागरिकांना सुध्दा टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. पुण्यात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि अभूतपूर्व वाढीशी जुळण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे.

रहिवाशांना खडतर नागरी परीक्षेचा सामना करावा लागत आहे. रस्ते दुभाजकांचे तुकडे तुकडे, रस्त्यावर लोंबकळत असलेल्या केबलच्या तारांसह आरोग्य आणि स्वच्छतेचा घसरलेला दर्जा यामुळे नागरिक, प्रवासी आणि परिसरातील रहिवाशांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरी पायाभूत सुविधांची सुधारणा, वाहतूक परिस्थितीचा उग्र प्रश्न, विमानतळ विकास, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेच्या समस्यांशी संबंधित अनेक मुद्द्यांवर विविध भागांत समस्या आहेत. जुन्या पुण्यात विविध विकास कामांसाठी महानगर पालिकेच्या वतीने झालेली आरक्षणे ५० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ अनिर्णित अवस्थेत आहेत.


पर्वती, जनता वसाहत, आंबिल ओढा, दांडेकर पूल, वडारवाडी, बोपोडी, येरवडा, वारजे रामनगर, ताडीवाला रोड, आदी भागातील झोपडपट्ट्यांच्या जमिनीच्या मालकीच्या समस्या, रहिवाशांशी करारातील गुंतागुंत आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीचा त्रासदायक इतिहास यातून मार्गक्रमण करावे लागते. प्रलंबित एसआरए प्रकल्प ही चिंतेची बाब आहे. करार करून अनेक वर्षे उलटली आहेत. आजही लोकांना या शहरात हक्काच्या जागेबद्दल खात्री नाही.

पुणे कँन्टोन्मेंट बोर्ड, पीसीबी परिसर स्वच्छतेकडे डोळेझाक करत आहे. सफाई कर्मचारी वक्तशीर नाहीत आणि सौंदर्यप्रसाधनाचे काम करत आहेत ज्यामुळे परिसर अस्वच्छ होत आहे. कचरा टाकणे ही एक मोठी समस्या आहे आणि त्वरित साफसफाई करणे आवश्यक आहे. आव्हाने अनेक पटींनी आहेत, आणि कँन्टोन्मेंट प्रशासन रहिवाशांकडून भारी कर घेऊनही नागरी सुविधा देण्यास उदासीन असल्याचे दिसून आले आहे. या परिसरात सुध्दा पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायम आहे. कँन्टोन्मेंट परिसरातील नागरी पायाभूत सुविधांची अवस्था दयनीय आहे आणि नागरी सुविधांचा विकास व्हावा यासाठी संरक्षण मंत्रालयाने विशेष निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पुणे पालिका क्षेत्रात २ वर्षे स्थानिक लोकप्रतिनिधी नसल्याने पाणी, रस्ते पायाभूत सुविधा आणि कचऱ्याची विल्हेवाट या समस्या वाढत आहेत. काही भागात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, तर काही शहरातील रस्त्यांवर वाहतुकीचा प्रश्न बिघडत चालला आहे. शहराच्या काही भागात नियमितपणे कचरा उचलला जात नाही. ■

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना

**मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे फायदे हे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होणार आहेत, या योजनेद्वारे ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक मदती बरोबरच इतर बरेच फायदे मिळणार आहेत. मुख्यमंत्री वयोश्री योजना द्वारे सहभागी ज्येष्ठ नागरिकांना ३ हजार रुपये DBT द्वारे थेट बँक खात्यात मिळणार आहेत. आर्थिक मदती बरोबरच वृध्द लोकांसाठी वेगवेगळे उपकरणे देखील दिले जाणार आहेत, जर ज्येष्ठ व्यक्ती अपंग असेल किंवा वयोमान अशक्त असेल तर या उपकरणांचा जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात फायदा होणार आहे.**



ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. वृद्धांची मुख्य चिंता 'आरोग्य, पालनपोषण आणि आधार.' पूर्वी ज्येष्ठांना घरात मान होता. काळ बदलला आजच्या ज्येष्ठ नागरिकांनी, नोकरी करून निवृत्तीने संसारात मिळते-जुळते घेऊन आधीच्या पिढीला सांभाळले. ग्रामीण भागात सर्व शेतीवर किंवा मजुरीवर अवलंबून असल्याने त्यांच्या हातात काही नाही. आजच्या पिढीत व्यावहारिकता वाढल्याने, ज्येष्ठ नागरिक खूप दुर्लक्षित असून त्यांचे दिवस कठीण आहेत. ज्येष्ठ नागरिकांना समाजात योग्य तो सन्मान मिळावा, त्यांचे राहणीमान सुसह्य व्हावे, आरोग्याच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव व्हावी यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी, ताणतणावातून मुक्त उत्तम आरोग्यासाठी, सामाजिक सन्मान मिळण्यासाठी महाराष्ट्रात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. या विभागामार्फत ९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्यात आले होते.

शासनाने एका नवीन अभिनव अशा योजनेला राज्यात मान्यता दिली आहे. या योजनेचे नाव आहे "मुख्यमंत्री वयोश्री योजना." मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात "मुख्यमंत्री वयोश्री" योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात प्रभावीपणे सुरू झाली आहे. राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे. ज्येष्ठांमध्ये वयोमानपरत्वे येणारे अपंगत्व, अशक्तपणा निराकरणासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे उदा. चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी. पात्र लाभार्थींना रु. 3000/- अक्षरी तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत. तसेच मानसिक स्वास्थ्य संतुलित ठेवण्यासाठी मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र, मनशक्ती केंद्र प्रबोधन, येथे सहभागी होता येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. 6 फेब्रुवारी 2024 रोजी सामाजिक न्याय विभागाने निर्गमित केला आहे.

या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे इ. कामे नोडल एजन्सी/केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था (CPSU) यांच्या माध्यमातून आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येईल. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरीता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरीता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे फायदे हे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होणार आहेत, या योजनेद्वारे ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक मदती बरोबरच इतर बरेच फायदे मिळणार आहेत. मुख्यमंत्री वयोश्री योजना द्वारे सहभागी ज्येष्ठ नागरिकांना ३ हजार रुपये DBT द्वारे थेट बँक खात्यात मिळणार आहेत. आर्थिक मदती बरोबरच वृध्द लोकांसाठी वेगवेगळे उपकरणे देखील दिले जाणार आहेत, जर ज्येष्ठ व्यक्ती अपंग असेल किंवा वयोमान अशक्त असेल तर या उपकरणांचा जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात फायदा होणार आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शासनाने वेगवेगळे पात्रता निकष ठरवले आहेत, त्यानुसार अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा कायमस्वरूपी रहिवासी असावा. लाभार्थी व्यक्ती ज्येष्ठ नागरिक (ज्या नागरिकांनी दि.31 डिसेंबर 2023 पर्यंत वयाची 65 वर्षे पूर्ण केली असतील) असे नागरिक पात्र समजण्यात येतील. 65 वर्षे आणि त्याहून अधिक वय असणाऱ्या व्यक्तीकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. किंवा आधारकार्डसाठी अर्ज केला असावा. ज्या लाभार्थीकडे आधारकार्ड नसेल त्यांनी स्वतंत्र ओळख दस्ताऐवज ओळख पटविण्यासाठी दाखवावे. ज्येष्ठ नागरिकाचे वार्षिक उत्पन्न हे २ लाखा पेक्षा कमी असावे.लाभार्थ्याने मागील तीन वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केलेले नसावे. या बाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात रु.3000/- थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर सदर योजनेअंतर्गत विहीत केलेली अपकरणे खरेदी केल्याचे तसचे मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक (Invoice) प्रमाणपत्र 30 दिवसांच्या आत संबधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे प्रमाणित करुन संबधित केंद्रीय सामाजिक उपक्रम (CPSU) संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर 30 दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल. निवड/ निश्चित केलेल्या जिल्हयात,लाभार्थ्यांच्या संख्येपैकी 30 टक्के महिला असतील. जे अर्जदार वरील पात्रता निकषांची पूर्तता करतील, लाभार्थी त्यांनाच मुख्यमंत्री वयोश्री योजनामध्ये सहभागी होता येईल.

आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे: 1) अर्जदाराचे आधार कार्ड 2) रहिवासी प्रमाणपत्र 3) ओळखपत्र 4) वयाचा पुरावा 5) रेशनकार्ड 6) अपंग असल्यास प्रमाणपत्र 7)मोबाईल नंबर 8) पासपोर्ट आकाराचा फोटो ही सर्व कागदपत्रे तुम्हाला मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज करताना सादर करायची आहेत.

**या योजनेचा लाभ कसा घ्यावा**

सर्वप्रथम वयोश्री योजनेच्या https://www.alimco.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यायची आहे. वेबसाईट वर गेल्यावर Mukhyamantri Vayoshri Yojana Apply Online साठी रजिस्ट्रेशन फॉर्म वर क्लिक करायचे. काळजीपूर्वक फॉर्म भरायचा आहे, सर्व माहिती अचूक टाकायची आहे. माहिती चुकीची आढळल्यास अर्ज बाद होऊ शकतो.

सूचनेनुसार आवश्यक ते सर्व कागदपत्रे Soft Copy मध्ये अपलोड करायचे आहेत. शेवटी वयोश्री योजनेचा फॉर्म भरून झाल्यावर अर्ज सबमिट करायचा आहे. अशा रीतीने या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन स्वरुपात अर्ज सादर करू शकता. अधिक माहितीसाठी आपल्या जिल्हयातील समाज कल्याण विभाग सामाजिक न्याय व विशेष विभागास भेट द्यावी.

**या संदर्भातील शासन निर्णय**

https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/202402061943344722...pdf या लिंक वर उपलब्ध आहे.

शासनामार्फत जेष्ठ नागरिकांसाठी विविध योजना उपक्रमे राबविण्यात येतात. ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 21 टक्के होणार असल्याचे लक्षात घेऊन शासनाने भविष्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी नवनवीन उपक्रम तयार केले आहेत. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रमांचा ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.

**- प्रविण डोंगरदिवे, उप संपादक,**
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई ■

Printed published and owned by Swati Dattatray Savate and printed at M/S S.R. Publication, mohan- arjun compound, godown no. 8,9,10, near ghartan pada, vaishali nagar, last bus stop, dahisar (e), Mumbai, Maharashtra-400068 and Published at Flat No. 301, 3rd Floor, Jivhala building, lane no.1, near bankar school, hadpsar (n.v.), Pune-411028. Editor - Narsing Digambar Kamble
E Mail id - maharashtramission2023@gmail.com / Contact No - 9665957984

# ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’ला विद्यार्थी आणि उद्योजकांनी भेट द्यावी

## राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आवाहन

पुणे : संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’ ला महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक आणि नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.इंटरनॅशनल एक्झिबिशन अँण्ड कन्व्हेनशन सेंटर, मोशी येथे ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’च्या पूर्वतयारीची श्री. सामंत यांनी पाहणी केली. यावेळी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह,



पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, गणेश निबे, किशोर धारिया, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, नितीन वानखेडे आदी उपस्थित होते.श्री. सामंत म्हणाले,

प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एमएसएमईना निःशुल्क दालन उपलब्ध करून द्यावे. सर्व उद्योग संघटनांच्या बैठका घेऊन त्यांना आमंत्रित करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.प्रदर्शनातील चार दालनांना शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पन्हाळा असे नाव देण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांच्या संरक्षण सिद्धतेची संकल्पना प्रदर्शित करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील १ लाखाहून अधिक विद्यार्थी या प्रदर्शनाला भेट देणार आहे. त्यांना १ हजार प्रकारचे तंत्रज्ञान पाहण्यासोबत भारतीय सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### २४ फेब्रुवारीपासून सुरू होणार प्रदर्शन

- मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे २४ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या प्रदर्शनात भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुसेना या तिन्ही सुरक्षा दलांचा महत्वाचा सहभाग आहे. प्रदर्शनातील विविध सत्रात भारताची संरक्षण सिद्धता, विविध शस्त्रास्त्रांची निर्मिती, संरक्षण क्षेत्रातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्राविषयी कुतूहल असते. त्यांना आधुनिक शस्त्रासोबत संरक्षण साहित्य जवळून पाहण्याची ही संधी आहे.स
- रक्षण अभियांत्रिकी उद्योगांनाही प्रदर्शनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट अप्स आणि इतर उद्योगांना उद्योग विस्तार आणि या क्षेत्रातील संधीविषयी प्रदर्शनातून माहिती मिळणार असल्याने उद्योग क्षेत्राशी निगडित प्रतिनिधींनी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.सामंत यांनी केले.

# उन्हाच्या झळा वाढल्या; राज्यातून थंडीची माघार



पुणे : राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. राज्यभरात हवामान कोरडे आणि आकाश निरभ्र आहे. त्यामुळे कमाल तापमानात वाढ झाली आहे. रविवारी अकोल्यात सर्वाधिक ३६.८ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. पुण्यात सर्वात कमी १५.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील आठवडाभर राज्यात हवामान कोरडे राहणार आहे. ढगाळ वातावरण कमी झाल्यामुळे आकाश निरभ्र आहे. परिणामी उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. रविवारी अकोल्यात सर्वाधिक ३६.८ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. यवतमाळमध्ये ३६.२ तर वाश्यांत कमाल तापमान ३५.० अशांवर होते.

मराठवाड्यात कमाल तापमानाचा पारा चढाच राहिला. नांदेडमध्ये ३५.८, परभणीत ३६.५, तर उत्तर महाराष्ट्रात जळगावात, मालेगावात ३६.२. मध्य महाराष्ट्रातील सांगलीत ३५.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. राज्याच्या अन्य भागांच्या तुलनेत किनारपट्टीलगत कमाल तापमान कमी राहिले, सरासरी तापमान ३२.० अंश सेल्सिअस होते. शनिवारच्या तुलनेत रविवारी कमाल तापमानात सरासरी १.० अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातून थंडी कायमची कमी होण्याची शक्यता आहे.

उत्तर भारतात एका पाठोपाठ तीव्र पश्चिमी झंझावात सक्रिय होत आहेत. त्यामुळे उत्तर भारतात काहीशी थंडी आहे. मात्र, या पश्चिमी झंझावाताचा (थंड वाऱ्याचा) राज्यातील वातावरणावर कोणताही परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे कमाल तापमानात वाढ झाली आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. माणिकराव खुळे यांनी दिली.

# विश्रांतवाडी येथे बौद्ध धम्म परिषद संपन्न



विश्रांतवाडी : निब्बाण एज्युकेशनल सोशियल ट्रस्ट समाध्यमातून आयोजित १३ वी बौद्ध धम्म परिषद कस्तुरबा सोसायटी हॉल येथे संपन्न झाली. बौद्ध धम्म परिषदेचे अध्यक्ष कुशीनगर येथील धम्मगुरू भदंत डॉ.इंदवंस महाथेरो हे होते.

धम्म परिषदेचे उद्घाटन नांदेड येथील भदंत पयाबोधी यांच्या हस्ते करण्यात आले. परिषदेसाठी राज्यातील धम्मगुरू आले होते. पुणे विद्यापीठ येथील धम्मगुरू भदंत यश यांची धम्म देसना, धम्म प्रवचन झाले. धम्म परिषदेचे प्रमुख आयोजक भदंत बुद्धघोष मेत्ता थेरो, सामाजिक कार्यकर्ते किशोर वाघमारे होते. यासाठी रवी साळवी, सुजाता साळवी, उत्तम यादव यांच्यासह उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय अन्न महामंडळाचे भागभांडवल २१ हजार कोटींवर

## केंद्र सरकारचा निर्णय ; कृषी अर्थव्यवस्थेला मिळणार बळ

पुणे : केंद्र सरकारने भारतीय अन्न महामंडळाचे (एफसीआय) अधिकृत भागभांडवल दहा हजार कोटी रुपयांवरून वाढवून २१ हजार कोटी रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. देशाची कृषी अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे हे एक धोरणात्मक पाऊल असल्याचा दावा केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्रालयाकडून करण्यात आला आहे.

देशाची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्याचे काम भारतीय अन्न महामंडळ करते. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या हमीभावाने (एमएसपीने) अन्नधान्यांची खरेदी करणे. अन्नधान्याच्या धोरणात्मक साठ्याची देखभाल करणे. गरजेनुसार, केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना अन्नधान्यांचे वितरण करणे. महागाई वाढल्याच्या काळात साठ्यातील अन्नधान्य बाजारात आणून महागाई आणि अन्नधान्यांच्या किमती नियंत्रित ठेवण्याचे काम करते.

केंद्र सरकारने एफसीआयच्या भाग भांडवलात केलेल्या भरघोस वाढीमुळे एफसीआयची कार्यप्रणाली अधिक गतिमान आणि व्यापक होणार आहे. एफसीआयला असलेली निधीची गरज आणि निधीची उपलब्धता यातील तूट भरून निघणार आहे. यापूर्वी निधीतील ही तूट भरून काढण्यासाठी एफसीआयला रोख कर्ज, कमी मुदतीची कर्जासह विविध मार्गांचा अवलंब करावा लागत होता. आता एफसीआयला ही तारेवरची कसरत करावी लागणार नाही.

भांडवल वाढीमुळे एफसीआयला साठवण सुविधांचे आधुनिकीकरण करता येईल. वाहतुकीचे जाळे मजबूत करता येईल. आधुनिक तंत्रज्ञानांचा उपयोग करून शेतीमालाची कापणी-पश्चात हानी कमी करून अन्नधान्यांची उपलब्धता वाढवता येईल. अन्नधान्याची वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षमतेने करता येईल. देशाची अन्नसुरक्षा अधिक मजबूत करता येईल.

# बिबट्याच्या हल्ल्यात दोन दुचाकीस्वार जखमी

नारायणगाव - येथील शेटे मळा शिवारात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन दुचाकीस्वार जखमी झाले. ही घटना शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. त्यांच्यावर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याला पकडण्यासाठी पिंजरा लावावा अशी मागणी येथील शेतकरी विकास तोडकरी, योगेश तोडकरी, धनंजय तोडकरी, संदीप पाटे, रोहन पाटे यांनी केली आहे.

बिबट्याच्या हल्ल्याची नारायणगाव परिसरातील मागील महिनाभरातील ही दुसरी घटना आहे. बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने व ऊस तोडणी सुरू झाल्याने बिबटे सैरभैर झाले आहेत. पाळीव जनावरांबरोबरच मानवावर बिबट्या हल्ले करू लागल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात प्रगतशील शेतकरी बाळासाहेब तोडकरी (वय-65) व भंगार व्यावसायिक शर्मा (वय-35) हे जखमी झाले आहेत.

## नरेंद्र मोदींचा दौरा लांबणीवर पडला असल्याने उद्घाटनाचा मुहूर्तही पुढे ढकलला

# पुणे मेट्रो विस्तारित मार्गाच्या उद्घाटनाचा मुहूर्त लांबणीवर

पुणे : पुणे मेट्रोचे रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १९ फेब्रुवारीला करण्याचे नियोजन होते. प्रत्यक्षात मोदींचा दौरा लांबणीवर पडला असल्याने उद्घाटनाचा मुहूर्तही पुढे ढकलावा लागला आहे. त्यामुळे रामवाडीपर्यंत मेट्रोने प्रवास करण्यासाठी प्रवाशांना आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

मेट्रोची विस्तारित सेवा गेल्या वर्षी १ ऑगस्टला सुरू झाली. वनाज ते रुबी हॉल हा ९.७ किलोमीटरचा मार्ग सुरू झाला. आधी या मार्गावर वनाज ते गरवारे स्थानकापर्यंत सेवा सुरू होती. नंतर गरवारे ते रुबी हॉल स्थानकापर्यंत सेवेचा विस्तार झाला. याच वेळी पिंपरी-चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय हा १३.९ किलोमीटरचा मार्ग सुरू झाला. आधी पिंपरी-चिंचवड महापालिका ते फुगेवाडी हा मार्ग होता. नंतर हा मार्ग फुगेवाडीपासून जिल्हा न्यायालयापर्यंत विस्तारला. आता



वनाज ते रुबी हॉल मार्ग आता रामवाडीपर्यंत विस्तारण्यात आला आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाले असून, त्याची अंतिम तपासणीही केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी केली आहे. त्यामुळे या मेट्रोच्या मार्गाच्या उद्घाटनाची औपचारिकता केवळ शिल्लक आहे. या विस्तारित मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचे नियोजन आखण्यात आले होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी १९ फेब्रुवारीपासून उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदींच्या हस्ते अनेक विकासकामांची पायाभरणी या दौऱ्यात होईल. यानंतर मोदी गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. यामुळे मोदींचा पुणे दौरा लांबणीवर पडला असून, मेट्रोच्या उद्घाटनाची मुहूर्तही हुकणार आहे.

### अद्याप हिरवा कंदील नाही

रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांनी १९ ते २१ जानेवारी या कालावधीत केली. या तपासणीदरम्यान त्यांनी या मार्गातील काही त्रुटी उपस्थित केल्या. या त्रुटी दूर करून महामेट्रोने त्याचा अहवाल आयुक्तांना पाठविला. त्यानंतर या मार्गाला अंतिम मंजुरी मिळण्याचा मार्ग खुला झाला. मात्र, अद्याप आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिलेला नाही, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

# नागरिक मते देण्यासाठी कंजूसपणा करणार नाहीत : शरद पवार

वाघोली - वाघोली माझ्या लोकसभा मतदार संघात असताना मतदारांनी मला मत देण्यासाठी कधी कंजूस पणा केला नाही. असेच प्रेम यापुढेही मतदार ठेवतील.असा विश्वास ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले.

येथील एका खाजगी कार्यक्रमासाठी शरद पवार वाघोली येथे आले होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार डॉ अमोल कोल्हे व परिसरातील पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. पवार पुढे म्हणाले, मी नगरला जातो त्यावेळी वाघोली व परिसराचा कायापालट झालेला पाहत असतो.

या भागात कोणते नागरिक राहतात याची मी चौकशी करतो. हिंजवडी सारख्या परिसरात आय टी पार्क आल्याने लाखो लोक नोकरीला लागले. पुणे हे शिक्षणाचे माहेर घर. अनेक जणांनी पुढाकार घेवुन शिक्षणाची दारे खुली केली. यामुळे कायापालट झाला. मगरपट्टा भागात शेतकरी एकत्र आले त्यांनी जमीन विकली



नाही.मात्र कंपनी स्थापन करून मोठे टाउनशिप उभी केली. यामध्ये लाखो लोक राहतात.

आयटी मुळे खराडी व वाघोली परिसराचा दिवसेंदिवस कायापालट होत आहे. खासदार अमोल कोल्हे म्हणाले, सिल्व्हर ओक असे निवासस्थान आहे. जिथे आदर, अस्मिता, प्रेम, मार्गदर्शन सगळे काही मिळते. असे निवासस्थान जेथून दिल्लीही हलते. यावेळी नागरिकांनी शरद पवार जिंदाबादच्या घोषणा दिल्या. संतोष देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

## पुणे पोलीस दलात ७ जणांचे निलंबन

# गुन्हेगारीला आळा घालणाऱ्या २ वरिष्ठ निरिक्षकांची बदली

पुणे (विशेष प्रतिनिधी) : लोणीकंद, हडपसर पोलिस ठाण्यातील वरिष्ठ निरीक्षकांची बदली करण्यात आली. लोणीकंद येथील झालेले जळीतकांड आणि हडपसर मधील महिलेस मारहाणीचे प्रकरण पोलिसांच्या अंगाशी असल्याची चर्चा सुरू असून विशेषतः हडपसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रयत्नांनी गुन्हेगारीला आळा बसला होता. आता गुन्हेगार पुन्हा डोके वर काढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांत पुणे पोलीस दलात ७ जणांचे निलंबन आणि दोन वरिष्ठांची बदली झाली. त्यामुळे कर्तव्यदक्ष पोलिसांमध्ये सुध्दा चिंता निर्माण झाली आहे.हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र शेळके यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांना सुध्दा बदलीस सामोरे जावे लागले. कर्तव्यात कसुरी केल्याचा ठपका काही कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर ठेवत निलंबनासारखी कठोर कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी बदलीचे आदेश काढले. काईंगडे यांची शहर पोलिस दलातील विशेष शाखेत, तर शेळके यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली.रोहिदास जाधव (वय ३४, रा. वाघोली) हा आपण दिलेल्या तक्रारीत




आरोपींवर काय कारवाई केली हे विचारण्यासाठी लोणीकंद पोलिस ठाण्यांतर्गत वाघोली पोलीस चौकीत १३ फेब्रुवारी रोजी आला होता. त्यावेळी सहायक फौजदार अशोक घेगडे, हवालदार कैलास उगले व महेंद्र शिंदे यांनी त्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले असा त्याचा संशय होता. अपमानास्पद वागणुक दिली गेली. त्यामुळे त्याने पोलीस चौकीच्या आवारात पेट्रोल टाकून पेटवून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यात तो ९५ टक्के भाजला. मारहाणीबाबतच्या त्याच्या तक्रारीची योग्य दखल पोलिसांनी घेतली नाही. यानंतर लोणीकंद पोलिसांनी प्रकरणी बिल्डरसह १५ जणांवर गुन्हा दखल केला होता. तथापि, लोणीकंद पोलीस ठाण्यातील ३ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले.दुसऱ्या बाजूला, हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मगरपट्टा पोलीस चौकीत चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या , घरकाम करणाऱ्या महिलेशी गैरवर्तन केल्याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षकासह दोन महिला कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. पोलीस कर्मचाऱ्यांकडून संबंधित महिलेस मारहाण केल्याचा प्रकार घडला होता. त्याबाबत व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तर त्याची दखल घेत पोलिस उपायुक्त आर. राजा यांनी तीन जणांना निलंबित केले.पोलीस दलातील बेशिस्तीला चाप लावण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पावले उचलली आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन काही सूचना दिल्या. ललित कला केंद्रात भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केल्यानंतर या घटनेची माहिती त्वरीत वरिष्ठांना न दिल्याने चतुःशृंगी पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षकाला निलंबित करण्याचे आदेश दिले. खून झालेला गुंड शरद मोहोळच्या पत्नीला धमकी दिल्याप्रकरणी अटक करण्यात आलेला आरोपी ससून रुग्णालयातून पसार झाल्यानंतर सायबर पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले.

### हडपसर परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली नाराजी

दरम्यान, हडपसर परिसरातील काही जाणकार नागरिकांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांची तडकाफडकी बदली झाल्यानंतर नाराजी व्यक्त केली. कार्यक्षम अधिकाऱ्यांनी सहकाऱ्यांवर दबदबा निर्माण केलेला असतो. खबऱ्यांचे जाळे निर्माण केलेले असते तसेच गुंडांना समज देऊन जुन्या गुन्हेगारांना हिसका दाखवलेला असतो. अशा परिस्थितीत बदली होणे पीडित नागरिकांसाठी अन्याय करणारे आहे, अशी प्रतिक्रिया बाळासाहेब तुपे (हडपसर) यांनी व्यक्त केली.नवीन अधिकारी आल्यावर पहिले काही महिने हार तुरे स्वीकारणे, हद्दीत काय घडते आहे, त्यावर काय उपाय करावेत हे समजावून घेण्यातच जातात. ३ जणांवर निलंबन कारवाई झालेली असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली करणे म्हणजे दबलेल्या गुंडांना मोकळे रान देण्यासारखे आहे, असे काही जणांचे म्हणणे होते.

### हडपसर मध्ये गुन्हेगारीचे प्रमाण जास्त

हडपसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रामटेकडीसारखी मोठी झोपडपट्टी आहे. साहजिकच गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे. कोयता गँगचा उपद्रव हडपसर परिसरात अनेक ठिकाणी वाढत चालला होता. अल्पवयीन मुले गुन्हेगारीत अडकत चालली होती. अशा परिस्थितीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र शेळके यांनी शाळा महाविद्यालयांत बैठका घेऊन मुलांचे समुपदेशन केले होते. हडपसर भागात एकूणच गुन्हेगारीला बऱ्यापैकी आळा बसत चाललेला असताना काही कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा झाला. त्याबद्दल दोन महिला पोलिसांसह एका कनिष्ठ अधिकाऱ्याचे घाईघाईने निलंबन करण्यात आले. तेही ठीक असेल, मात्र नंतर पोलीस ठाण्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याची तडकाफडकी बदली करण्यात आली. या कारवाईचा पोलीस आयुक्त फेरविचार करतील किंवा पुन्हा शेळके यांची नियुक्ती हडपसर मध्ये होईल याची शक्यता कमी आहे. तथापि, नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

# विद्यार्थ्यांनी बौद्धिक दृष्टीने सक्षम व्हावे : अमृत बंग



मंचर : ''सध्याच्या काळात केवळ पदवी घेऊन रोजगार मिळणार नाही तर, शिक्षणातून आपण आपली बौद्धिक क्षमता अधिक विकसित केली पाहिजे. त्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी बौद्धिक दृष्टीने अधिक सक्षम व्हावे,'' असे गडचिरोली येथील निर्माण संस्थेचे प्रकल्प संचालक अमृत बंग यांनी सांगितले.

मंचर (ता. आंबेगाव) येथील रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष कार्यक्रमाप्रसंगी बंग बोलत होते. डॉ. मोहन साळी हे अध्यक्षस्थानी होते. या वेळी प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड, डॉ. रामलाल कटारिया, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य राजाराम बाणखेले, उदय पाटील, डॉ. बाळासाहेब गार्डी, डॉ. गणेश वाघ उपस्थित होते.

बंग म्हणाले, ''तरुणांनी सोशल मीडिया व इतर अनावश्यक गोष्टींच्या आहारी न जाता समाजातील उत्तम व्यक्तिमत्त्व, त्यांची चरित्रे, उत्तम पुस्तके, ग्रंथ यांचे वाचन करावे. देशात युवकांची संख्या अधिक आहे जर, युवकांना विधायक मार्ग दिला तर निश्चित ही भावी पिढी उत्तम घडेल.'' डॉ. साळी यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. श्रद्धा महाकाळ यांनी सूत्रसंचालन तर, डॉ. विलास सदाफळ यांनी आभार मानले.

### शाळा मोफत गणवेश योजना ; १३८ कोटी रुपयांचे टेंडर

# कापड खरेदीत गुजरात-राजस्थान उत्पादकांच्या फायद्याचा घाट घातल्याचा आमदाराचा आरोप

कोल्हापूर : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ४० लाख ६० हजार विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेसाठी कापड खरेदीबाबत शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्यावतीने १३८ कोटी रुपयांचे नुकतेच टेंडर काढले आहे. या टेंडरमध्ये गुजरात व राजस्थानच्या कापड उत्पादकांना अनुकूल अशा अटी- शर्ती टाकण्यात आल्या आहेत, असा आरोप समाजवादी पक्षाचे भिवंडीचे आमदार रईस शेख यांनी केला आहे. सदर टेंडर प्रक्रिया रद्द करावी आणि महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळामार्फत कापड खरेदी करावे, अशी मागणी आमदार शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून केली आहे.



### धोरणाला हरताळ फासला

- राज्यात १३ लाख यंत्रमागधारक आहेत. यामध्ये २५ लाख रोजगार असून शेतीनंतर राज्याला सर्वाधिक रोजगार पुरविणारे यंत्रमाग क्षेत्र आहे.
- वस्त्रोद्योग विभागाने वर्ष २०२३ चे नवे वस्त्रोद्योग धोरण नुकतेच जाहीर केले आहे.
- त्यामध्ये यंत्रमाग क्षेत्राला संधी देण्याची शासनाने हमी दिली असल्याची आठवण आमदार शेख यांनी पत्रात दिली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात आमदार शेख म्हणतात की, या योजनेसाठी १ कोटी २० लाख मीटर कापड खरेदीचे टेंडर काढण्यात आले आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत सदर टेंडर भरता येणार आहे. देशातील निम्मे म्हणजे १३ लाख यंत्रमाग महाराष्ट्रात त्यातही बहुतांश भिवंडीमध्ये आहेत. मात्र, या योजनेसाठी गुजरात व राजस्थानच्या कापड उत्पादकांकडून शालेय शिक्षण विभाग कापड खरेदी करू इच्छित आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातले यंत्रमागधारक या बोलीपासून दूर राहतील, अशी व्यवस्था या टेंडरमध्ये करण्यात आली आहे. कापड खरेदीच्या टेंडरमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या कापड उत्पादकांची प्रतीदिन १ लाख मीटर उत्पादकता असावी, तीन वर्षातली उलाढाल ५५ लाखांपेक्षा अधिक असावी, एका वेळचा पुरवठा किमान ६० लाखांचा असावा, अशा अटी-शर्ती टाकून राज्यातील यंत्रमागधारक मोफत गणवेश योजनेच्या टेंडरमधून बाद कसे होतील, असे षडयंत्र टेंडरमध्ये रचण्यात आले आहे, असा दावा आमदार रईस शेख यांनी केला आहे.

**टेंडर आधीच ठरले**

मोफत गणवेश टेंडरसाठी टेंडर पूर्व बैठक २ फेब्रुवारी रोजी शिक्षण परिषदेच्या मुंबई कार्यालयात झाली. या परिषदेला गुजरात तसेच राजस्थानातील व्यापाऱ्यांबरोबर मोजकेच स्थानिक व्यापारी उपस्थित होते. त्यामुळे टेंडर कुणाला द्यायचे हे आधीच ठरवून त्यानुसार नियोजन केल्याचे दिसून येत असल्याचे आमदार शेख पत्रात म्हणतात.

मोफत गणवेश योजनेच्या टेंडर प्रक्रियेत राज्यातील यंत्रमाग धारकांना सहभागी होता येणे त्यांचा नैसर्गिक हक्क आहे. म्हणून राज्याबाहेरील कापड उत्पादकांच्या सोईच्या अटी-शर्ती टाकलेले टेंडर रद्द करण्यात यावे आणि महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला नोडल एजन्सी नेमून मोफत गणवेश योजनेसाठी कापड खरेदी करावी, अशी मागणी आमदार रईस शेख यांनी केली आहे.

## अवकाळी पावसाचा १ हजार ८६ हेक्टर क्षेत्राला फटका



**बुलढाणा** : जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने १ हजार ८६ हेक्टर क्षेत्रावरील रब्बी पिके व फळबागांना तडाखा बसला आहे. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक पाहणीत ही बाब आढळून आली आहे. १५ फेब्रुवारीच्या संध्याकाळी व रात्री अवकाळी पावसाने वाऱ्यासह जिल्ह्यात हजेरी लावली. बुलढाणा, खामगाव व नांदुरा या तालुक्यात अवकाळीचा जोर जास्त होता. कृषी विभागाने आज शुक्रवारी केलेल्या पाहणीत या तालुक्यातील ४८ गावांना फटका बसल्याचे दिसून आले. तसेच १ हजार ८६ हेक्टर क्षेत्रावरील गहू, रब्बी ज्वारी, हरभरा व मका या पिकासह फळबागांचे नुकसान झाले आहे.

सर्वाधिक तडाखा बसलेल्या बुलढाणा तालुक्यात ४०५ हेक्टरवरील गहू, शाळू, मका व हरभरा या पिकांची नासाडी झाली. तालुक्यातील १३ गावांतील शेतकरी बाधित झाले. खामगाव तालुक्यातील २० गावांतील ३७५ हेक्टरवरील फळबागा, गहू, हरभरा, मक्याचे नुकसान झाले. नांदुरा तालुक्यातील १५ गावांतील ३६०.५० हेक्टर क्षेत्रातील केळी, कागदी लिंबू, गहू, मका, ज्वारी पिके बाधित झाली. कृषी अधीक्षक अधिकारी मनोज ढगे यांनी जिल्हाधिकारी किरण पाटील यांना हा अहवाल सादर केला.

दरम्यान गुरुवारी रात्री ९.३० वाजता अंगावर विजेचा लोळ कोसळून सूरज सुभाष निंबाळकर ( रा. टाकळी हाट, ता. शेगाव) यांचा मृत्यू झाला. खामगाव मार्गावरील जयपूर लांडे फाट्याजवळ ही दुर्घटना घडली. याचा अहवाल शेगाव तहसीलदार यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी यांना सादर केला. अवकाळी पाऊस व वाऱ्यामुळे बहरलेला आंब्याचा मोहोर गळाला आहे. याशिवाय ज्वारी, गहू, हरभरा या रब्बी पिकांचे नुकसान झाले. याशिवाय सोंगून ठेवलेल्या पिकांची नासाडी झाली.

## मुक्त विद्यापीठात मोडी लिपीचे प्रशिक्षण

**नाशिक** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखा आणि राज्य शासनाचे पुरभिलेख संचालनालय यांच्यातर्फे कार्यशाळा झाली. या वेळी 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतील सभागृहात झालेल्या कार्यशाळेचे प्रास्ताविक मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी केले.

विषयतज्ज्ञ पुरभिलेखाधिकारी मनोज राजपूत यांनी भूमिका कथन केली. पहिल्या सत्रात संशोधक सहाय्यक अमोल महल्ले यांनी मोडी लिपी बाराखडी आणि रेघीय पद्धती याचे प्रशिक्षण दिले. दुसऱ्या सत्रात पंकज पाटील यांनी मोडी लिपीतील संक्षिप्त शब्द व त्याच्या व्याख्येविषयी माहिती दिली. कोल्हापूर अभिलेखागार येथील अभिलेखाधिकारी गणेश खोडके यांनी विविध कालगणना, महाराष्ट्रातील शासकीय व अशासकीय दफ्तरखाणे याची माहिती दिली.

कागदपत्रांचा कालखंड कसा ओळखावा याबद्दल मार्गदर्शन केले. शहरातून सुमारे शंभराहून अधिक व्यक्तींनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.याप्रसंगी कार्यशाळेतील सहभागींना 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' ही पुस्तिका देण्यात आली. पुराभिलेख संचालनायल मुंबई येथून रोहित खोले आणि नरेश जोशी उपस्थित होते.

## सकल मराठा समाजाचा आमदारांच्या घरासमोर ठिय्या

सोलापूर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने शहरातील तीनही आमदारांच्या घरासमोर आंदोलन करण्यात आले. आमदार प्रणिती शिंदे यांचा गैरसमज झाल्याने मराठा आंदोलक जनवात्सल्य समोर आक्रमक झाले होते. प्रणिती शिंदे यांचा गैरसमज दूरध्वनीद्वारे दूर केल्यानंतर ही घोषणाबाजी थांबवून निवेदन देण्यात आले.

मागील काही दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे.

सोलापुरात तीन आमदारांपैकी विजयकुमार देशमुख हे आपल्या निवासस्थानी होते तर आमदार सुभाष देशमुख हे दिल्लीमध्ये आहेत आणि आमदार प्रणिती शिंदे या मुंबईत त्यांच्या पक्षाच्या अधिवेशनाला गेल्याने त्या भेटू शकल्या नाहीत. या दोन्ही आमदारांच्या






स्वीय सहायकांनी निवेदने स्वीकारली. सकल मराठा समाजाचे माऊली पवार यांच्या कार्यालयातून मराठा बांधवांनी एकत्रित येऊन रेल्वे लाइन परिसरातील आमदार विजयकुमार देशमुख यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी आरक्षण मागणीच्या घोषणा देण्यात आल्या.जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावली असल्याने यावेळी मराठा बांधवांनी सरकारने तातडीने उपोषणस्थळी जाऊन त्यांचे उपोषण सोडवावे, अशी आग्रही मागणी केली. आमदार विजयकुमार देशमुख यांनी बाहेर येऊन मराठा बांधवांचे निवेदन स्वीकारले. यावेळी संबोधित करताना देशमुख यांनी मी कायमच मराठा समाजाच्या सोबत आहे, तुमच्या आरक्षणाची मागणी मान्य होईल, सरकार त्यासाठी प्रयत्न करीत आहे. येणाऱ्या अधिवेशनात मी सुद्धा निश्चित आरक्षण देण्याची आग्रही मागणी करेन, असे आश्वासन दिले.

आमदार प्रणिती शिंदे यांचा गैरसमज झाल्याने मराठा आंदोलक जनवात्सल्यसमोर आक्रमक झाले होते. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या घरासमोर आंदोलन करून सर्व मराठा बांधव हे सात रस्ता परिसरातील आमदार प्रणिती शिंदे यांच्या निवासस्थानासमोर आले. यावेळी त्या ठिकाणी ठिय्या मांडून घोषणाबाजी करण्यात आली. आमदार प्रणिती शिंदे या मुंबईमध्ये पक्षाच्या अधिवेशनात असल्याने त्यांना फोन लावण्यात आला. परंतु इथल्या गोंधळामुळे त्यांना स्पष्ट ऐकता आले नाही, त्यांचा गैरसमज झाला. त्यांनी फक्त काँग्रेसच्याच आमदारांच्या घरासमोर आंदोलन कशाला भाजपचे सत्ताधारी आमदार आहेत तिथे का गेले नाहीत, असा प्रश्न केला असता मराठा बांधवांमधून एकच गोंधळ उडाला, त्यांनी आमदार प्रणिती शिंदे यांचा निषेध करण्यास सुरवात केली. हा गोंधळ बराच वेळ चालला शेवटी त्यांना व्यवस्थित सांगण्यात आले. त्यानंतर आमदार शिंदे यांनी येणाऱ्या अधिवेशनात आपण निश्चित आरक्षणाचा मुद्दा ताकदीने मांडू, असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलकांनी शिंदे यांचे स्वीय सहाय्यक बंटी चंदनशिवे यांच्याकडे निवेदन देऊन तिथून रवाना झाले.

## इंग्रजी शाळांमधील 'आरटीई' प्रवेश बंदमुळे खासगी शाळांचे शुल्क वाढण्याची शक्यता

**सोलापूर** : जिल्ह्यात जवळपास ४०० स्वंयअर्थसहाय्यित शाळा असून, नावाजलेल्या इंग्रजी शाळांचे शैक्षणिक शुल्क ४० ते ७० हजारांपर्यंत आहे. दरवर्षी शुल्क वाढते, पण त्याची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत पोचत नाही. आता इंग्रजी शाळांमधील 'आरटीई' प्रवेश बंद होणार असल्याने यंदा अनेक शाळांकडून शुल्क वाढविण्याची शक्यता आहे. त्यामुळे शाळा व पालकांच्या शुल्क नियमन समितीत वार्षिक शुल्क ठरवितानाच खबरदारी घ्यावी. शाळेचे नियम व अटी मान्य असतील तरच पालकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेश तेथे निश्चित करावा.




खासगी शाळांच्या शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शुल्क नियंत्रण कायदा असून, दरवर्षी किती शुल्क वाढवायचे हे ठरलेले आहे. शाळांमध्येही पालक आणि शाळेची स्वतंत्र शुल्क नियमन समिती असते. प्रवेश सुरू झाल्यावर समितीच्या पहिल्याच बैठकीत शुल्क निश्चित होते. त्याची माहिती पालक व शाळांनाच असते, आम्हाला त्यासंबंधीची माहिती नसते. त्यामुळे पालकांनी प्रवेशावेळी शुल्क परवडत असेल तरच त्याठिकाणी प्रवेश घ्यावा, अन्यथा शासकीय अनुदानित शाळांमध्येही ते मुलांचा प्रवेश घेऊ शकतात.

**- तृप्ती अंधारे**, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

सोलापूरसह मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरांमध्ये स्वंयअर्थसहाय्यित इंग्रजी शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी अनुदानित शाळांच्या परिसरातच अशा शाळा उघडल्या जात असल्याने अनेक अनुदानित व जिल्हा परिषद, महापालिकांच्या शाळांना घरघर लागली आहे. काही वर्षांत जिल्हा परिषदेच्या अंदाजे ३२ शाळांना टाळे लागणार असून, सध्या दोनशे शाळांचा पट १ ते २० पर्यंतच आहे. शासकीय शाळांची गुणवत्ता व इंग्रजी शिक्षणाचा अभाव, यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पालकांचा कल आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढला आहे. पालकांचा हा कल ओळखूनच इंग्रजी शाळांकडून दरवर्षी शैक्षणिक शुल्कात वाढ केली जात असल्याचे चित्र आहे.

## सुधारित बाजार समिती कायद्यास विरोध

सांगली : बाजार समिती सुधारित कायद्यास विरोध, कायदेशीर मार्गाने हरकती घेण्याचा निर्णय पश्चिम महाराष्ट्रातील विविध बाजार समित्यांच्या सभापती, संचालक प्रतिनिधींच्या सांगली बाजार समितीत झालेल्या बैठकीत आज झाला. केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय मंडळ नियुक्त केले जाण्यासह विविध बदल करण्यात येणार आहेत.



सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वसंत मार्केट यार्डात सांगली, सातारा, रत्नागिरी, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बाजार समित्यांचे प्रतिनिधींची बैठक झाली. कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय मंडळ नियुक्त केले जाण्यासह विविध बदल करण्यात येणार आहेत. त्यास विरोधाचा निर्णय घेतला.

सांगली बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे म्हणाले, 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विकास व विनियमन अधिनियमामध्ये नवीन सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. शेतकऱ्याची फसवणूक होऊ नये हा मुख्य हेतू बाजार समितीच्या स्थापना करण्यामागे होता. परंतु नवीन कायद्यामुळे तो निष्फळ होण्याची शक्यता आहे. बाजार समितीचे व्यवस्थापन मंडळ लोकशाही मार्गाने निवडून आलेले असणे आवश्यक आहे.'

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे सदस्य अॅड. प्रकाश देसाई म्हणाले, 'प्रत्येक बाजार समितीच्या अडीअडचणी मुद्दे वेगवेगळे आहे. नवीन सुधारणांमध्ये सभापती, उपसभापती, संचालक मंडळ शेतकरी प्रतिनिधीकडून लोकशाही मार्गाने निवडून येणे आवश्यक आहे. विविध बाजार समितीच्या प्रतिनिधींनी या चर्चेत भाग घेऊन या कायद्याला कडाडून विरोध केला.

नवीन बदलामुळे समित्या आर्थिक डबघाईस येतील. छोट्या व्यापाऱ्यांचा व्यापार बंद पडून मोठ्या भांडवलदार व्यापाऱ्यांची एकाधिकारशाही निर्माण होईल. शेतकऱ्यांसह व्यापारी, अडते हमाल यांच्यापुढे सुद्धा अडीअडचणी येणार आहेत. पश्चिम महाराष्ट्रासह कोकण विभागातील बाजार समित्यांनी कायद्याविरोधात एकजुटीने लढा देण्याचे ठरले. यासाठी सांगली, कोल्हापूर, कराड, रत्नागिरी, विटा यांनी पुढाकार घेऊन आंदोलनाची दिशा ठरविण्याचे ठरले.'

संतोष पुजारी (सभापती, आटपाडी बाजार समिती), पोपट चरापले (बाजार समिती, शिराळा), संदीप पाटील (सभापती, इस्लामपूर बाजार समिती), शंकरराव पाटील (उपसभापती, कोल्हापूर बाजार समिती), भानुदास यादव (लोणंद बाजार समिती), राजेंद्र पाटील (पाटण बाजार समिती), संभाजी चव्हाण (उपसभापती, कराड बाजार समिती), तसेच सांगली बाजार समितीचे उपसभापती रावसाहेब पाटील, संचालक आनंदराव नलवडे, संग्राम पाटील, बाळासाहेब माळी, काडप्पा वारद, मारुती बंडगर, शशिकांत नागे, रामचंद्र पाटील, याशिवाय रत्नागिरी, विटा, गडहिंग्लज, तासगाव, वाई, दहिवडी, वडूज, फेलवडगाव, लोणंद, फलूस, कोरेगाव, खंडाळा आदी बाजार समितीचे सभापती, सचिव पदाधिकारी उपस्थित होते. सांगली बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांनी आभार मानले.

### तीन तालुक्यात जानेवारीअखेर २ लाख ७ हजार ३३५ एकरवर लागवड

# अनुकूल वातावरणामुळे बहरले कांद्याचे पीक, उत्पन्न वाढणार

**मालेगाव** : तालुक्यासह कसमादेतील दुष्काळी परिस्थितीत केंद्र शासनाने निर्यातबंदी केल्यामुळे गेल्या अडीच महिन्यापासून कांद्याला जेमतेम भाव मिळत आहे. निर्यात बंदी मागे घेण्याच्या मागणीकडे सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी डोळेझाक केली आहे. परिस्थितीशी दोन हात करत उपलब्ध पाण्यावर शेतकऱ्यांनी उन्हाळी कांद्याची जम्बो लागवड केली आहे.



यावेळी आतापर्यंत तरी निसर्ग बळीराजाला साथ देत आहे. अनुकूल वातावरणामुळे उन्हाळी कांद्याचे पीक जोमात असून उत्पन्न वाढीची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे काही ठिकाणी कमी लागवड झाली असली तरी उत्पन्न वाढणार असल्याने गेल्या वर्षाएवढाच उन्हाळी कांदा बाजारात येऊ शकेल.

गेल्यावर्षी सर्वत्र जेमतेम पाऊस झाला. शेतकऱ्यांनी मका, बाजरी, कपाशी आदी खरीप पिकांची लागवड केली. दरम्यानच्या काळात पाऊस रुसल्याने पिके कोमेजली. त्याचवेळेत कांदा बाजारात भाव खात होता. जून ते नोव्हेंबर या कालावधीत उन्हाळी कांद्याला चांगला भाव मिळाला. दिवाळीनंतर तर कांद्याचे भाव चार हजारावर गेले होते.

भाव मिळत असल्याचे पाहून शेतकऱ्यांनी मका, बाजरी व कपाशीचे अर्धवट पीक काढून त्या जागी लेट खरीप कांदा लागवड केली. लागवडीची धूम सुरु असतानाच केंद्राने ८ डिसेंबर २०२३ ला कांदा निर्यातबंदी लागू केली. निर्यातबंदी लागू करताच कांद्याचे भाव ५० ते ७० टक्क्यांनी घसरले. शेतकरी संघटनांसह विविध राजकीय पक्षांनी आंदोलने केली. मात्र या आंदोलनाचा शासनावर कोणताही फरक पडला नाही.

सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांनी केंद्राकडे बोट दाखवत आपली सुटका करून घेतली. अडीच महिन्यापासून कांद्याचे भाव हजार ते पंधराशे रुपये दरम्यान आहे. बहुतांशी कांदा ७०० ते ८०० रुपये दराने विकला गेला. भाव आणखी घसरण्याच्या भीतीने शेतकऱ्यांनी मिळेल त्या भावात कांदा विक्री केली.

कसमादेसह नाशिक जिल्हा कांदा उत्पादनात आघाडीवर आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे यावर्षी उन्हाळी कांद्याची लागवड व उत्पन्न घटेल अशी चर्चा होती. प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी महागडे बियाणे, उळे घेऊन उन्हाळी कांदा लागवड केली आहे. मालेगाव, बागलाण व नांदगाव या तीन तालुक्यात गेल्या वर्षी जवळपास २ लाख ९० हजार एकरवर उन्हाळी कांदा लागवड करण्यात आला होता.

यावर्षी या तीन तालुक्यात जानेवारीअखेर २ लाख ७ हजार ३३५ एकरवर लागवड झाली आहे. उर्वरित जिल्ह्यात देखील हजारो एकरवर कांदा लागवड करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीत निसर्ग शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आला आहे. सुदैवाने बेमोसमी पाऊस, गारपीट झाली नाही. कांद्याला असलेली आवश्यक थंडी देखील पडली.

त्यामुळे उन्हाळी कांद्याचे पीक जोमात आहे. कसमादेत सर्वत्र उन्हाळी कांद्याची रेलचेल आहे. काही ठिकाणी गेल्या वर्षाच्या तुलनेने कमी अधिक प्रमाणात लागवड झाली असली तरी अनुकूल वातावरणामुळे उत्पन्न वाढणार आहे. चांगल्या वातावरणामुळे फवारणी व इतर खर्चातही बचत झाली.

### मार्चच्या मध्यात उन्हाळी कांदा बाजारात येणार

- रांगडा व लेट खरीप कांदा सध्या बाजारात येत आहे. गेल्या पंधरा दिवसापासून कांद्याची आवक घटली आहे. यातून लेट खरीप कांदा अखेरच्या टप्प्यात असल्याचे मानले जात आहे.
- एरवी मार्च अखेरपर्यंत लाल कांदा बाजारात यायचा. यावर्षी मात्र कमी उत्पादनामुळे लाल कांद्याची आवक कितपत राहते हे पहाणे उत्सुकतेचे ठरेल.
- उन्हाळी कांदा १५ मार्चनंतर बाजारात येऊ शकेल. शेतकऱ्यांच्या आशा आता उन्हाळी कांद्यावर अवलंबून आहेत. निर्यातबंदी मागे घेऊन उन्हाळी कांद्याला चांगला भाव मिळाल्यास कसमादेच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकेल. कांदा निर्यातबंदी मागे न घेतल्यास खान्देशमध्ये लोकसभा निवडणुकीत कांदा हा प्रचाराचा मुद्दा ठरू शकेल.

## अमरावती-यवतमाळ मार्गावर भीषण अपघात

### चार ठार, १० जण जखमी



अमरावती : यवतमाळ मार्गावर नांदगाव खंडेश्वर नजीक शिंगणापूर येथे सिमेंट कॉंक्रिट मिक्सर ट्रकने टेम्पो ट्रॅव्हलरला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात चार तरूणांचा जागीच मृत्यू झाला, तर १० जण गंभीररीत्या जखमी झाले. हा अपघात रविवारी सकाळी घडला. जखमींवर येथील जिल्हा सामान्य रुग्णालय आणि खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व तरूण अमरावतीहून यवतमाळ येथे एका क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जात होते.

श्रीहरी राऊत, आयुष बहाळे, सुयश अंबर्ते, संदेश पाडर अशी मृत तरूणांची नावे आहेत. येथील रुक्मिणी नगर आणि रवी नगर परिसरात राहणारे १४ ते १५ तरूण यवतमाळ येथे आयोजित क्रिकेट सामन्यासाठी टेम्पो ट्रॅव्हलरने जात होते. सकाळी नऊ वाजताच्या सुमारास शिंगणापूर फाट्यानजीक एका भरधाव सिमेंट कॉंक्रिट मिक्सर ट्रकने टेम्पो ट्रॅव्हलरला धडक दिली. अपघातात चार तरूणांना जागीच मृत्यू झाला, तर १० जण जखमी झाले.

जखमींना नांदगाव खंडेश्वर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यातील पाच गंभीर जखमींना अमरावती येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

# मुलींना मोफत शिक्षण, स्थानिक पातळीवर निवडणुका स्वतंत्र होतील

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सूतोवाच

**नवी मुंबई :** राज्यात लवकरच ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी आहे अशा पालकांच्या मुलींना मोफत शिक्षण दिले जाणार आहे. याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अल्पसंख्याक मेळाव्यात दिली. नवी मुंबईत रविवारी पार पडलेल्या या मेळाव्यात वक्फ बोर्डबाबत अनेक समस्या असून त्या सोडवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचीही माहिती त्यांनी दिली. या वर्षी मुस्लिम समाजाच्या विकासासाठी १५०० कोटींचा निधी दिला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. आम्ही सरकारमध्ये सामील झालो असलो तरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत मात्र स्थानिक कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

नवी मुंबईतील वाशी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने अल्पसंख्याक मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी अजित पवार यांनी आपल्या भाषणात विविध मुद्दे स्पष्ट केले. अल्पसंख्याक लोकांनी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात मोलाचे कार्य केले आहे. काही लोक मुस्लिम समुदायात भयाचे वातावरण निर्माण करून आपली राजनीती चालवतात. आम्ही सर्व एकसाथ मिळून राज्य करीत आहोत. राज्यातील जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची आहे. आम्ही अल्पसंख्याक जनतेचा आदर करतो, त्यांना प्रतिनिधित्व देतो. असे सांगत त्यांनी राज्यातील अनेक ठिकाणी मुस्लिम लोकांना दिलेल्या प्रतिधित्वाची यादीच वाचून दाखवली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात अनेक मुस्लिम सैनिक होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसवर मुस्लिम समाजाने कायम विश्वास दाखवला, तो विश्वास सार्थ करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असणार आहोत. विकास कार्यात सर्वांना सोबत घेऊन जाणार आहेत. बाबा सिद्दीकी काही दिवसांपूर्वी आमच्या सोबत आले. त्यांच्या मदतीने मुस्लिम समाजाचे प्रश्न अधिक स्पष्ट होऊन उपायोजना करता येईल. मुस्लिम युवतींना शिक्षणात मदत केली जाईल. वक्फ बोर्ड जमिनीबाबत अनेक समस्या आहेत. असे काही लोकांनी आम्हाला सांगितले. वक्फ बोर्ड जमिनीबाबत लक्ष घेत समस्या सोडवा अशी मागणी काही लोकांनी केली आहे. याबाबत काही सूचनाही आम्ही दिल्या आहेत. अल्पसंख्यकांच्या विकासासाठी गेल्या वर्षी ५०० कोटी रुपये दिले. या वर्षी १५०० कोटी देण्याचा प्रयत्न आहे. यापूर्वी उर्दू हाऊस नांदेड, नागपूर, मालेगाव, सोलापूर येथे स्थापन केले. यापुढे छत्रपती संभाजी नगर, भिवंडी, परभणी, धुळे येथेही उर्दू हाऊस निर्माण करणे विचाराधीन आहे. काही लोक तुम्हाला आम्ही विचारधारा सोडली सांगतील, मात्र हे खरे नाही .

### स्थानिक पातळीवरील निर्णयानुसार पुढे चालणार


आगामी निवडणुकीत भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला. अनेक कार्यकर्त्यांना वाटते. स्थानिक स्वराज्य संस्थेत अनेकांना इच्छा असते. पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस सोबत असताना जसे त्या त्या ठिकाणी स्थानिक पातळीवरील निर्णयानुसार पुढे चालणार आहोत. याची नोंद घ्यावी. इथून पुढेही सर्व समाजाला सोबत घेऊन सर्व समाजाचे सण खेळीमेळीने साजरा करू. तीच महाराष्ट्राची संस्कृती आहे.



# 'कौशल्य विकास' योजनेमधून महाराष्ट्रात ३० टक्केच रोजगार

## देशात ९ वर्षांत १२ .३५ लाख तरुणांना प्रशिक्षण






**नागपूर :** तरुणांच्या हाताला काम देण्याच्या अनुषंगाने अत्यंत गाजावाजा करून केंद्र सरकारने सुरू केलेल्या पंतप्रधान कौशल्य विकास योजनेतून महाराष्ट्रात आठ वर्षांत फक्त ३० टक्के युवकांनाच रोजगार संधी मिळू शकली आहे. युवकांच्या हाताला काम मिळावे म्हणून केंद्र सरकारने २०१५ पासुन पंतप्रधान कौशल्य विकास योजना सुरू केली. तरुणांना रोजगारक्षम प्रशिक्षण देऊन उद्योग क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे व रोजगार संधी निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे.

राज्यात एकूण ६४ रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. त्यातून उमेदवारांची निवड केल्यावर मनुष्यबळाची गरज असलेल्या उद्योगांशी त्यांची सांगड घातली जाते व त्यांच्या गरजेनुसार मुलांच्या नावांची शिफारस केली जाते. स्किल इंडिया डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून उमेदवारांना नोकऱ्या व प्रशिक्षणार्थी सेवेची संधी मिळू शकते. केंद्र सरकारकडून यासाठी निधीही दिला जातो. देशभरात ९ वर्षांत १२.३५ लाख तरुणांना विविध प्रकारचे कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रात अलीकडेच नमो रोजगार मेळावे घेण्यात आले. नागपूरमध्येही हा मेळावा झाला होता.

### रोजगाराचा शोध सुरूच

केंद्रीय कौशल्य विकास मंत्रालयाने या योजनेच्या महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा तपशील काही दिवसांपूर्वी संसदेत सादर केला होता. त्यानुसार महाराष्ट्रात २०१५ ते पासुन ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत एकूण २ लाख ७० हजार ३४७ तरुणांना उद्योग क्षेत्राला लागणारे अल्पकालीन प्रशिक्षण (शॉर्टटर्म ट्रेनिंग) देण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत ८० हजार, ९५० (३० टक्के) जणांना विविध उद्योग आस्थापनांत रोजगार संधी मिळाली आहे. उर्वरितांचा मात्र रोजगाराचा शोध सुरू आहे.

# पाणीसाठ्यात होतेय झपाट्याने घट; जिल्ह्यातील पाणीसाठा ५२ टक्क्यांवर



**नांदेड :** गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानात वाढ झाल्याने पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. त्याचबरोबर शेतीसिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होताना दिसून येत आहे. सध्या जिल्ह्यातील एकूण १०४ छोट्या मोठ्या आणि लघु प्रकल्पात ३८३.३५ दशलक्षघनमीटरनुसार ५२.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

मागील वर्षी याच कालावधीत ४३४.०३ दलघमीनुसार ५९.६१ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, म्हणून आत्तापासूनच सर्वांना काळजी घ्यावी लागणार आहे. नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णुपुरी प्रकल्पात सध्या ५२.९० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. नांदेड पाटबंधारे विभागातर्फे दर आठवड्याला प्रकल्पातील पाणीसाठ्याची माहिती देण्यात येते. जिल्ह्यात मागील वर्षी पावसाळ्यात झालेल्या पावसामुळे संपूर्ण प्रकल्पात शंभर टक्के पाणीसाठा झाला होता.काही भागात अचानक झालेल्या अतिवृष्टी आणि ढगफुटी सदृष्य पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली होती. जिल्ह्यातील सर्वच १०४ प्रकल्पात समाधानकारक पाणीसाठा झाला होता. आजघडीला जिल्ह्यात मोठा प्रकल्प असलेल्या विष्णुपुरी प्रकल्पात सध्या ४२.७४ दलघमीनुसार ४३.९१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दुसरा मोठा प्रकल्प असलेल्या मानार (बारूळ) प्रकल्पात ६०.६९ दलघमीनुसार ५२.९० टक्के पाणीसाठा आहे.

यासोबतच जिल्ह्यातील नऊ मध्यम प्रकल्पात ५८.६४ दलघमीनुसार ४२.१७ टक्के पाणीसाठा आहे. चार कोल्हापुरी बंधाऱ्यात २.७६ दलघमीनुसार ३७.११ टक्के पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील ८० लघू प्रकल्पात १००.७० दलघमीनुसार ५८.२८ टक्के पाणीसाठा आहे. नऊ उच्च पातळी बंधाऱ्यात ११७.८१ दलघमीनुसार ६२.०७ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती पाटबंधारे विभागातर्फे देण्यात आली आहे.जिल्ह्यात एकूण १०४ प्रकल्पात ३८३.३५ दशलक्ष घनमीटरनुसार ५२.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. परभणी जिल्ह्यातील येलदरी प्रकल्पात ४१४.८० दलघमीनुसार ५१.२२ टक्के पाणीसाठा आहे.

# नेते, उद्योगपतींनंतर आता ईडी व्यापाऱ्यांना छळणार

## वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड . प्रकाश आंबेडकर यांचा इशारा




**वर्धा :** वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वर्धा येथे आयोजित सभेत बोलताना व्यापारीवर्गास सावध राहण्याचा इशारा दिला. ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राजकीय नेते, उद्योगपती यांच्यावर विविध कारवाया झाल्या, त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. राजकीय नेते नाईलाज म्हणून भाजपात गेले. कारण, त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबास तुरुंगात टाकण्याची धमकी देण्यात आली होती. कुटुंबाचा छळ होऊ नये म्हणून या नेत्यांना पक्ष सोडावा लागला. आता व्यापारीवर्गावर ही वेळ येणार आहे. कारण, एखाद्यास मानवी रक्ताची चटक लागली की तो कोणालाच सोडत नाही. उद्योगपती, नेते यांच्यासाठी तुम्ही-आम्ही होतो. पण व्यापारीवर्गाच्या बचावसाठी जनताच राहणार नाही. मोदी पुन्हा सत्तेवर येऊ नये म्हणून तुम्ही विरोधात मतदान केले पाहिजे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.

दिल्लीत आंदोलन करताना कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप झाला. मात्र ए. राजा, कानिमोझी हे न्यायालयात निर्दोष सुटले. कारण न्यायालयात पुरावेच सादर झाले नाही. न्यायाधीश म्हणाले होते की, मी रोज पुरावे सादर करण्याची वाट पाहात होतो. पण ते न आल्याने निर्दोष सोडावे लागले. हा निर्णय २०१६ मध्ये आला. त्यावेळी मोदी सरकार होते. 'ना खाऊंगा, ना खाणे दूंगा' म्हणणाऱ्याने पुरावे का सादर केले नाहीत, याचे उत्तर दिले पाहिजे, असे आवाहन ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. सध्या शेतकरी, कामगार, बेरोजगार यांच्यावर चर्चाच होत नाही. हे 'आम' जनतेचे सरकार नाही. ३७० कलम रद्द झाल्याचा आनंद व्यक्त होतो. पण अद्याप जम्मू काश्मीरमध्ये निवडणुका का नाही, याचे उत्तर भाजपाने दिले पाहिजे. तेथील वर्तमान स्थिती लपून ठेवल्या जात आहे. विश्वगुरू होण्याआधी गल्लीगुरू होऊन दाखवावे, असा टोला त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लगावला. जाती-धर्मास प्राधान्य देऊ नका, आपल्याला संविधान वाचवायचे असल्याने मतदान विचारपूर्वक करा, असे आवाहनही ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. व्यासपीठावर वंचित नेत्यांसह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

# धक्कादायक ! ५५० ग्रामपंचायतीत रोजगर हमी योजनेची कामेच नाही, मजुरांची दैना



**बुलढाणा :** दुष्काळसदृश्य परिस्थिती असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात रोजगाराची वानवा असताना तब्बल ५६१ ग्रामपंचायतीमध्ये रोहयो ची कामेच सुरू नाहीये! यामुळे कामाच्या शोधात असलेल्या हजारो मजुरांची दैना होत असल्याचे दुर्दैवी चित्र आहे.पावसाच्या लहरीपणामुळे खरीप हंगाम उध्वस्त झाला. सोयाबिन, कपाशी या मुख्य पिकासह सर्व पिकांच्या एकरी उत्पादनात ४० टक्के घट आली. त्यातच हाती आलेल्या पिकांना मातिमोल भाव मिळत आहे. रब्बी पिकांनाही अवकाळी पावसाचा तडाखा मिळाला. यामुळे शेतीत कामे नसल्याने रोहयो ची कामे हाच मजुरांचा आधार आहे. मात्र जिल्ह्यातील ८८९ पैकी ५६१ ग्रामपंचायत क्षेत्रात मनरेगा ची कामेच सुरू नसल्याने मजुरांची स्थिती बिकट झाली.

शेगाव तालुक्यातील ४६पैकी ५, नांदुरा मधील ६५ पैकी १५, चिखली ९९ पैकी ३४, सिंदखेड राजा ८९ पैकी २८ ग्रामपंचायत मध्येच कामे सुरू आहे. अशीच बिकट स्थिती इतर तालुक्यातील आहे.गावागावातील युवा वर्ग पोटाची खळगी भरण्यासाठी महानगरात स्थलांतरित झाला आहे. मात्र उर्वरित ग्रामीण मजुरांना रोजगारच नसल्याचे चित्र आहे.

### आठ हजारांवर मजूर

सध्या ३२८ ग्रामपंचायत मध्ये कामे सुरू आहे. यात वृक्ष लागवड, घरकुल, सिंचन विहीर, पांदण रस्ते, गुरांचे गोठे आदि कामाचा समावेश आहे. या कामावर तब्बल ८२१७ मजूर आहेत. फेब्रुवारीच्या मध्यावरच असलेली ही लक्षणीय संख्या लक्षात घेतली, तर मजुरांना रोजगाराची सक्त आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते. एरवी एप्रिल मध्ये इतकी मजुरांची उपस्थिती राहते.

# अहिराणी साहित्य संमेलन नेरला

**धुळे :** खानदेश साहित्य संघ महाराष्ट्र, धुळे व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यातर्फे सातवे अखिल भारतीय अहिराणी साहित्य संमेलन २५ फेब्रुवारीला नेर (ता. धुळे) येथे होणार आहे. या एकदिवसीय साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी डॉ. सुधीर देवरे, तर स्वागताध्यक्षपदी आमदार कुणाल पाटील यांची निवड झाली. आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांच्या हस्ते अहिराणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होईल.

९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. भारत सासणे विशेष अतिथी असतील. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. पुष्पराज गावंडे, डॉ. धनंजय गुडसरकर, प्रसिद्ध साहित्यिक मीनाक्षी पाटील संमेलनाला उपस्थित असतील.

नेर येथील स्वातंत्र्यसैनिक स्व. अण्णासाहेब चूडामण पाटील साहित्य नगरीत हे साहित्य संमेलन होईल. यापूर्वीच्या सहा संमेलनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. अहिराणी साहित्य संमेलनाची ही परंपरा कायम ठेवत अहिराणी भाषा व साहित्याच्या वृद्धीसाठी संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदाची धुरा आपल्या खांद्यावर घेत उत्तम पद्धतीने नियोजन करणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

### कार्यक्रमांची रेलचेल

ग्रंथदिंडी, उद्घाटन सत्र, पुस्तक प्रकाशन, पुस्तक प्रदर्शन, परिसंवाद, कथाकथन, चार सत्रांमध्ये अहिराणी भाषेतील कवितांचे सादरीकरण होणार आहे. दिवसभर चालणाऱ्या या संमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक तथा खानदेश साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सदाशिव सूर्यवंशी.

सचिव कवी रमेश बोरसे, प्राचार्या रत्ना पाटील, रमेश राठोड व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. साहित्य संमेलनासाठी विशेष कार्य अधिकारी प्रकाश पाटील, कवी जगदीश देवपूरकर, रमेश बोरसे, सुभाष अहिरे, प्राचार्या रत्ना पाटील, प्रा. रमेश राठोड, प्रा. अशोक शिंदे, शाहीर नानाभाऊ पाटील, गोकुळ पाटील, शरद धनगर. डॉ. नरेंद्र खैरनार, डॉ. कुणाल पवार, हेमलता पाटील, चूडामण पाटील, विजय पाटील, देवदत्त बोरसे, जितेंद्र चौधरी, प्रवीण देवरे, सुनीता बोरसे, जितेंद्र बहारे, सुनीता पाटील, के. बी. लोहार, शाहीर श्रावण वाणी, वीरेंद्र बेडसे, डॉ. भव्या पाटील, बाळासाहेब गिरी, दिनेश चव्हाण, गणेश पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

### संमेलनाध्यक्षांची २८ पुस्तके

संमेलनाध्यक्ष डॉ. देवरे यांनी २८ पेक्षा जास्त पुस्तकांचे लेखन केले असून, विविध ग्रंथांचेही संपादनही केले आहे. अहिराणी भाषा, कला, लोकजीवन व लोकवाङ्मयाचे ते अभ्यासक आहेत. लिखाणासाठी असंख्य पुरस्कारांनीही त्यांना गौरविण्यात आले आहे.

## अंमलबजावणीने गत वर्षीच्या तुलनेत बालमृत्यूचे प्रमाण कमी

# बालमृत्यूच्या प्रमाणात २५ टक्के घट



**नाशिक :** जिल्ह्यात एकाबाजूला कुपोषित बालकांचे प्रमाण वाढत असताना विविध योजनांच्या अंमलबजावणीमुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे. केंद्राच्या पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अभियान योजनेसह जिल्हा परिषदेच्या स्तनपान व पोषण अभियान या सुरू असलेल्या उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम असल्याने गत वर्षीच्या तुलनेत यंदा बालमत्यूत २५ टक्के घट झाली आहे.

गत वर्षी जिल्ह्यात ५५३ बालकांचा विविध कारणांनी मृत्यू झाला. त्या तुलनेत यंदा बालमृत्यूची संख्या ४२३ आहे. यात ३५३ नवजात, तर ७० बालकांचा समावेश आहे. यामध्येही कमी दिवसांची व कमी वजनाने सर्वाधिक ८७ बालकांचा मृत्यू झाला आहे. आरोग्य विभागातर्फे ही आकडेवारी देण्यात आली आहे.

गर्भवती आणि माता कुपोषित राहिल्यास बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेक महिलांना गरोदरपणात मजुरी करावी लागते. शारीरिक क्षमता नसतानाही त्यांना मजुरीला जावे लागते. या महिला कुपोषित राहतात. त्यामुळे अनेकदा माता आणि बालमृत्यू होतात. वाढत्या बालमृत्यूत कमी वजनाची बालके, न्यूमोनिया व जन्मजात व्यंगत्व ही कारणे असल्याचे समोर आले.

त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी तालुकानिहाय समित्यांची स्थापना करून, बालमृत्यू झालेल्या पालकांची भेट घेऊन काय उपाययोजना करता येतील याचा अहवाल मागविला. यात माता गरोदर राहिल्यापासून ते प्रसुतिपर्यंत, तर बाळाचा जन्म झाल्यापासून ते वर्षभरापर्यंत आराखडा तयार करून दिला.

यात गरोदरपणातील आरोग्यसेवा व पहिल्या तिमाहीतील गरोदर मातांची सोनोग्राफी केली जाते. दरमहा ९ तारखेला पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत गरोदर मातांची स्त्रीरोगतज्ज्ञांकडून तपासणी बंधनकारक केली. त्याचे वेळापत्रक तयार करत त्याची जनजागृती केली.

११२ आरोग्य केंद्रांपैकी तब्बल ६५ आरोग्य केंद्रांमध्ये शिबिरे घेण्यात आली. मुंबई आयआयटीच्या मदतीने स्तनपान व पोषण अभियान श्रीमती मित्तल यांनी राबविले. यात स्तनपानाचे महत्त्व महिलांना पटवून दिले, तसेच बालकांच्या आहारावर लक्ष केंद्रित केले. परिणामी, आरोग्य विभागाने राबविलेल्या सुविधांमुळे बालमृत्यूच्या प्रमाणात काहीशी घट झाली आहे.

> "आयआयटी मुंबईच्या सहकार्याने जिल्ह्यात प्रभावी स्तनपान व पोषन कार्यक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक बाळ हे महत्त्वाचे आहे, या उद्देशाने सूक्ष्म नियोजन करून आशा अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी, वैयक्तिक अधिकारी लक्ष घालून माता व बालक यावर लक्ष केंद्रित करत बालाला, तसेच गरोदर मातेला सर्व सेवा व लसीकरण प्राप्त करून देत आहेत. गंभीर बालकांसाठी त्वरित संदर्भ सेवा मिळावी, यासाठी विशेष लक्ष देत आहोत. पुढील वर्षी बालमृत्यूचा आकडा आणखी कमी करण्यावर काम करत आहोत."
>
> **- डॉ. सुधाकर मोरे,**
> जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद

### इतर सुरू असलेल्या उपाययोजना

दर आठवड्याला बालमृत्यूचा कारणानिहाय आढावा घेणे, माता रुग्ण व नातेवाइकांच्या समुपदेशनावर भर देण्यात आला. अतिजोखीम गावात मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक, आजारी बालकांसाठी औषध खरेदी, आरोग्य केंद्रांमध्ये नवजात शिशू काळजी कोपरा तयार करणे, १०० टक्के लसीकरण करणे, कमी वजनाची बालक- पालकांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून आहाराबाबत मार्गदर्शन करणे, आशा, आरोग्यसेविका यांच्यावर बालकांची जबाबदारी सोपविली जात आहे.

# पावणे एमआयडीसीतील रासायनिक कंपनीत आग



**नवी मुंबई :** नवी मुंबई लगत असणाऱ्या ठाणे बेलापूर आद्योगिक पट्ट्यात पावणे येथील सी १५७ भूखंडावरील सुजन कंपनीच्या गो डाऊन मध्ये आग लागली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रासायनिक द्रव्य असलेले पिंप ठेवलेले होते. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच कोणी जखमी झाल्याचे आढळून आले नाही.

आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पावणे एमआयडीसीतील सुजन या कंपनीत आग लागली. ही आग कंपनीच्या मागील बाजूस असलेल्या गो डाऊन मध्ये आग लागली. या ठिकाणी रसायन भरलेले पिंप फुटू लागल्याने पाहता पाहता आगीच्या भक्ष्यस्थानी पूर्ण कंपनी पडली. सदर कंपनीला लागून असलेल्या महेक कंपनीला ही आगीची झळ बसली.

आगी बाबत माहिती मिळताच पावणे, महापे, शिरवणे एमआयडीसी अग्निशमन दल दाखल झाले. मात्र आगीची रौद्रता पाहता नवी मुंबई मनपा अग्निशमनचीही मदत घेण्यात आली आहे. सध्या आग आटोक्यात आली आहे.

# महत्त्वाचे

## पुढील ४८ तासांत महाराष्ट्रासह अनेक राज्यात पावसाची शक्यता



नवी दिल्ली : एकीकडे देशातील काही भागात थंडीची लाट पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे काही भागात पावसानं हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या ताज्या हवामान अंदाजानुसार, पुढील ४८ तासांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशात काही भागात आज आणि उद्या वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे.

आयएमडी च्या अंदाजानुसार, वेस्टर्न डिस्टर्बन्सच्या प्रभावामुळे पंजाबमध्ये १८ ते २० फेब्रुवारी, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि इतर राज्यांमध्ये १९ ते २१ फेब्रुवारी दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे.आयएमडीने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, देशात १८ फेब्रुवारीपासून २२ फेब्रुवारीपर्यंत विविध भागात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशाच्या हवामानात पुन्हा एकदा बदल पाहायला मिळणार आहे. काश्मीर खोऱ्यातही पुढील काही दिवस पावसाची शक्यता आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, चंडीगड, लडाखमध्ये १८ ते २२ या काळात पाऊस पडण्याची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे. पुढील २४ तासांत, जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशच्या काही भागांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस आणि हिमवृष्टीसह हलका ते मध्यम पाऊस आणि हिमवृष्टीची शक्यता आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये प्रचंड थंडी आहे. हिमाचल प्रदेशात यावेळी फारशी बर्फवृष्टी न झाल्यामुळे दोन्ही राज्यांमध्ये थंडी वाढत आहे. हवामान खात्याने हरियाणा, पंजाब आणि चंदीगडमध्ये धुक्याचा इशारा जारी केला आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये थंडीपासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही.

**महाराष्ट्रातही 'या' भागात पावसाची शक्यता** - वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशासह राज्याच्या हवामानात बदल पाहायला मिळणार आहे. महाराष्ट्रातही आज पावसाची शक्यता आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात कोकण वगळता अनेक भागात तुरळक पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## मराठी चित्रपटांना तीस लाख प्रोत्साहन अनुदान देण्याची मागणी

**कोल्हापूर :** सध्या मराठी चित्रपट व्यवसाय अडचणीत आला असून चित्रपट निर्मितीचा खर्च जास्त व चित्रपटगृहातील वसुली कमी अशी स्थिती आहे. त्यामुळे राज्य शासनाने चित्रपटाचा दर्जा पाहून सरसकट तीस लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशी मागणी अखिल भारतीय मराठी चित्रपट निर्माता महामंडळाने आज पत्रकार परिषदेत केली.

महामंडळाचे अध्यक्ष विजय शिंदे म्हणाले,'दरवर्षी सुमारे १०० ते १२५ मराठी चित्रपट निर्माण होतात. साधारण ६० लाखांपासून ते पाच कोटीपर्यंतचे बजेट असते. पण त्या प्रमाणात चित्रपटगृहातून त्याची वसुली होत नाही. तसेच चित्रपटगृह हे निर्मात्यांना भाडेतत्वावर घ्यावे लागते. मराठी निर्मात्यांचे चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी राज्य शासनाने चित्रपटगृह बांधणीसाठी प्रयत्न करावेत. अनुदान कमिटीची गुणांच पद्धत चुकीची आहे, ती बंद करून नवीन पद्धतीचा अंमल करावा. चित्रपटगृहे मराठी चित्रपटास आठ आठवडे आरक्षित करावी.'

दरम्यान, या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ३० एप्रिलला दादर येथील दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्यासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. तरीही मागण्या मान्य झाल्या नाहीत तर कोल्हापूर ते मुंबई पदयात्रा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी देवेंद्र मोरे, बाळासाहेब गोरे, महादेव साळोखे, रंगराव कोटकर, सतिश बीडकर, अशोक सुर्यवंशी, मेघना निकडे, संगीता पिंगळे, अशोक जाधव, राजू जाधव, उत्कर्ष कुरकेट्टी, दिलीप अभनावे, अनिल काशीकर उपस्थित होते.

## नाशिकमध्ये २५ ठिकाणी 'आपला दवाखाना'

**नाशिक :** महापालिकेकडून शहरात २५ ठिकाणी स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू केला जाणार असून पहिल्या टप्प्यात १२ ठिकाणी योजना राबविली जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून राज्यात स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आला आहे. राज्यात योजनेंतर्गत ७०० दवाखाने सुरू केले जाणार आहेत.

मुंबईत ७२ ठिकाणी आपला दवाखाना सुरू करण्यात आला. नाशिकमध्येदेखील २५ ठिकाणी आपला दवाखाना तयार केले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात १२ ठिकाणी दवाखाने सुरू केले जातील. या माध्यमातून किरकोळ आजारांवर उपचार केले जातील. यातून मोठ्या रुग्णालयांवरील ताण कमी होणार आहे. २५ ते ३० हजार वस्तीनजीक दवाखाने सुरू होतील. यात मोफत वैद्यकीय सेवा मिळेल. सकाळी ७ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत हे दवाखाने सुरू राहतील. या दवाखान्यात एक वैद्यकीय अधिकारी, एक परिचारिका, एक फार्मासिस्ट आणि एक बहुउद्देशीय सेवक आणि एक सुरक्षारक्षक असा पाच जणांची टीम कंत्राटी पद्धतीने नियुक्त केली जाणार आहे.

त्यासाठी भाडेतत्वावर सुमारे एक हजार चौरस फुटाची घेणार जागा घेतली जाणार आहे. त्यात वेटिंग रूम, डॉक्टर रूम, फार्मासिस्ट रूम, नर्सिंग रूम तसेच स्वच्छतागृह या सुविधा राहतील. शासनाकडून एक लाख रुपयांपर्यंत भाडे निश्चित करण्यात आले आहे.

## लवकरच पन्हाळगडावर उभारणार शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा

पन्हाळा : 'पन्हाळगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासह पूर्णाकृती पुतळा लवकरच उभारणार असल्याची घोषणा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला केली. पन्हाळगडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने स्वराज सप्ताहांतर्गत आयोजित विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर होते. यावेळी पालकमंत्री मुश्रीफ म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज या दोन्हीही राजांनी उत्तुंग कार्य केले. त्यामुळेच शेकडो वर्षानंतरही आपण त्यांच्या पालख्या अभिमानाने वाहतो, त्यांचा जयजयकार करतो. हेच रयतेचे कल्याणकारी स्वराज्य यावे, अशीच जनतेची मनोमनी अपेक्षा असते.' यावेळी मुश्रीफ यांनी शिवाजी महाराजांची राजनीती, युद्धनीती, स्वभाव गुण यांसह अनेक ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला.

यावेळी शीतल फराकटे, मधुकर जांभळे, संतोष धुमाळ, गोकुळचे संचालक प्रा. किसनराव चौगुले, अमरसिंह माने-पाटील, बबासाहेब देशमुख, आसिफ फरास, संभाजीराव पाटील, अमित गाताडे, आसिफ मोकाशी, शिरीष देसाई, शिवाजी देसाई, प्रकाश पाटील-टकळकर, आदी प्रमुख उपस्थित होते.

## गोवंडीमधील झोपडपट्टीला आग

**मुंबई:** गोवंडीमधील बैंगनवाडी परिसरातील झोपडपट्टीत शनिवारी पहाटे भीषण आग लागली होती. या आगीत १२ ते १५ झोपड्या जळून खाक झाल्या. सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

घाटकोपर – मानखुर्द जोडरस्त्यावरील बैंगनवाडी परिसरातील आदर्श नगर येथील झोपडपट्टीत शनिवारी पहाटे ४ च्या सुमारास भीषण आग लागली. या परिसरात झोपडपट्टी आणि अनेक भंगाराची गोदामे आहेत. या गोदामांच्या पहिल्या मजल्यावर घरे असून तेथे अनेक जण वास्तव्यास आहेत. आगीची माहिती मिळताच नागरिकांनी तत्काळ घराबाहेर धाव घेत अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. अग्निशमन दलाच्या सहा गाड्या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र तोपर्यंत १० ते १५ झोपड्या आणि गोदामांना आगीचा विळखा पडला होता.

# वसई भाईंदर रो रो सेवा मंगळवारपासून सुरू होणार



**वसई / पालघर :** मागील आठवड्याभरापासून विविध तांत्रिक अडचणींमुळे वसई भाईंदर रोरो सेवा सुरू होण्यास विलंब झाला होता. आता यातून मार्ग काढत महाराष्ट्र सागरी मंडळाकडून मंगळवारपासून ही सेवा सुरू करण्यात येणार आहे.

सध्या "प्रायोगिक तत्त्वावर" रो-रो प्रवासी सेवा दिली जाणार आहे. वसई भाईंदर या भागातील नागरिकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे वसई- भाईंदर दरम्यान रोरो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुवर्णदुर्ग शिपींग व मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्या मार्फत चालविली जाणार असून जान्हवी या फेरीबोटीची क्षमता ३३ वाहने व १०० प्रवाशी अशी असणार आहे. या बोटीला केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेतून परवानगी मिळालेली असून जेटीची सर्व कामे महाराष्ट्र सागरी मंडळाने केली आहेत. ही सेवा १३ फेब्रुवारी पासून सुरू केली जाणार होती. त्यानंतर १६ फेब्रुवारी पासून करण्याचे निश्चित केले होते. मात्र ऐनवेळी निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींमुळे सलग दोन वेळा याचे उदघाटन रद्द करावे लागले होते.

आता महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत वसई खाडीमध्ये वसई ते भाईंदर दरम्यान सध्या "प्रायोगिक तत्त्वावर" रो-रो प्रवासी फेरीबोट सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सेवा मंगळवार दि २० फेब्रुवारी पासून सुरु केली जाणार आहे. फेरीबोटीचे सुरक्षित व सुलभ नौकानयन, जेट्टी व बोटीमधून प्रवासी आणि वाहनांची सुलभ चढ-उतार आणि सुयोग्य नौकानयन मार्ग या सर्व बाबींची खात्री झाल्यानंतर, ह्या फेरीबोट सेवेचा लोकार्पण सोहळा औपचारिकरित्या करण्यात येणार आहे असे सागरी मंडळाकडून सांगण्यात आले आहे.

फेरीबोट सेवा प्रायोगिक तत्वावर सुरु होणार असली तरी, वाहतूक कोंडीचा सामना करत वसई ते भाईंदर असा रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांची वेळ व इंधनाची बचत करणारा, प्रदूषणमुक्त, पर्यावरणस्नेही व आरामदायी असा जलवाहतूक सेवेचा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जनतेसाठी ही सेवा नक्कीच दिलासादायक ठरेल असा विश्वास महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ माणिक गुरसळ यांनी व्यक्त केला आहे. सध्या वसई भाईंदर या भागातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लोकल गर्दी, महामार्गावरील वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे रोरो सेवा सुरू झाली तर येथील प्रवाशांना अवघ्या काही मिनिटातच फेरीबोटीने वसई भाईंदर असा प्रवास करता येणार आहे. अखेर प्रायोगिक तत्वावर ही सेवा सुरू होणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**अशी असेल फेरीबोटीची वेळ**

दररोज ही फेरीबोटी सकाळी पावणे सात ते सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत दिली जाणार आहे. भरतीच्या वेळी कमी अंतराच्या पूर्वी निश्चित केलेल्या ०.८ सागरी मैल अंतर असलेल्या मार्गाचा वापर होणार असल्याने प्रवास वेळ कमी लागणार आहे. तर ओहोटीच्या वेळेला सुमारे दोन सागरी मैल अंतराचा मार्ग लागेल असे महाराष्ट्र सागरी मंडळाकडून सांगण्यात आले आहे.

### असे असतील प्रायोगिक तत्वावरील बोटींचे तिकीट दर

- मोटारसायकल (चालकासह) – ६० रुपये
- रिकामी तीन चाकी रिक्षा मिनीडोर (चालकासह) – १०० रुपये
- चारचाकी वाहन (कार) (चालकासह)- १८० रुपये
- मासे, पक्षी, कोंबडी, फळे इ. (प्रति टोपली) व कुत्रा, शेळी, मेंढी (प्रति नग) – ४० रुपये
- प्रवासी प्रौढ (१२ वर्षावरील) – ३० रुपये
- प्रवासी लहान (३ ते १२ वर्षापर्यंत)- १५ रुपये

# वांद्रे रेक्लेमेशनमधील २९ एकर जागेचा विकास अदानी समूह करणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) वांद्रे रेक्लमेशन येथील मोक्याच्या ठिकाणच्या २९ एकर जागेचा विकास अदानी समूह करणार आहे. या जागेच्या विकासासाठी मागविल्या निविदा प्रक्रियेत अदानी समूहाने सर्वाधिक बोली लावून निविदेत बाजी मारली आहे. आता लवकरच एमएसआरडीसीच्या बैठकीत निविदा अंतिम करण्यात येणार आहे.

वांद्रे – वरळी सागरी सेतूलगत एसएसआरडीसीचे मुख्यालय आहे. या मुख्यालयासमोर एमएसआरडीसीच्या मालकीचा २२ एकर आणि ७ एकर क्षेत्रफळाचा एकत्रित २९ एकर भूखंड आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एमएसआरडीसी या भूखंडाचा वापर कास्टिंग यार्ड म्हणून करीत होती. आता याच जागेचा विकास करण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे. त्यानुसार या जागेवर निवासी वा अनिवासी उत्तुंग इमारत संयुक्त भागीदारीतून बांधण्यात येणार आहे. एमएसआरडीसीकडून कोट्यवधीचे रस्ते विकास प्रकल्प राबविले जात आहेत. अशावेळी निधीची चणचण कमी करण्यासाठी या जागेचा विकास करून त्यातून आठ हजार कोटींहून अधिकचा महसूल मिळविण्याचा एमएसआरडीसीचा प्रयत्न आहे.

या २९ एकर जागेच्या विकासासाठी एमएसआरडीसीने जानेवारीत निविदा मागविल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आणि अदानी, एल. अँण्ड टी. तसेच मायफेअर या कंपन्यांनी यासाठी तांत्रिक निविदा सादर केल्या. या निविदांची छाननी करून नुकत्याच एमएसआरडीसीने आर्थिक निविदा खुल्या केल्या आहेत. यात अदानी आणि एल. अँड टी.ची निविदा पात्र ठरली आहे. त्यातही अदानीने सार्वधिक बोली लावली आहे.एमएसआरडीसीने लावलेल्या बोलीपेक्षा अदानीने २२.७ टक्क्यांनी अधिक बोली लावली आहे. तर एल. अँड टी.ने बोलीच्या १८ टक्के अधिक बोली लावली आहे. अदानीची बोली सर्वाधिक असल्याने आता हे कंत्राट या कंपनीला मिळण्याचीच शक्यता अधिक आहे. पुढील आठवड्यात महामंडळाच्या बैठकीत निविदा अंतिम करण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास जाधव यांनी दिली.

# गिरणी कामगार पात्रता निश्चितीच्या विशेष अभियानाला मुदतवाढ

**मुंबई :** दीड लाख गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांची पात्रता निश्चिती करण्यासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने सुरू कलेल्या विशेष अभियानाला अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. या अभियानाची मुदत गुरुवारी, १५ फेब्रुवारी रोजी संपुष्टात येत होती. मुंबई मंडळाने गुरुवारी या अभियानाला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली. त्यामुळे आता ज्या गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांनी अद्याप कागदपत्रे जमा केलेली नाहीत त्यांना आता १५ मार्चपर्यंत कागदपत्रे जमा करून पात्रता निश्चिती करून घेता येणार आहे.

मुंबई मंडळाकडे घरासाठी अर्ज केलेल्या कामगार आणि वारसांपैकी एक लाख ५० हजार ४८४ गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांची पात्रता निश्चिती सोडतीआधीच करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी मंडळाने विशेष अभियान सुरू केले आहे. त्यानुसार मुंबई मंडळ या कामगार आणि वारसांकडून ऑफलाइन आणि ऑनलाइन पद्धतीने कागदपत्रे जमा करून घेत आहे. तर कामगार विभाग पात्रता निश्चिती करत आहे. या अभियानाला १४ सप्टेंबरपासून सुरुवात झाली. सुरुवातीला तीन महिन्यांसाठी हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र या कालावधीत अनेक कामगार, वारस कागदपत्रे जमा करू शकले नव्हते. त्यामुळे या अभियानाला मुदतवाढ देण्यात आली. आता शेवटची मुदत १५ फेब्रुवारी रोजी संपणार होती. मात्र त्याच दिवशी मंडळाने या अभियानाला पुन्हा मुदतवाढ दिली.

# झोपडपट्ट्यांच्या स्वच्छतेसाठी दीड हजार कोटी खर्च करणार



**मुंबई :** मुंबईतील झोपडपट्ट्यांमधील स्वच्छतेसाठी मुंबई महानगरपालिकेला उशीरा को होईना जाग आली आहे. झोपडपट्ट्यांमधील स्वच्छता, कचरा गोळा करणे, शौचालयांची स्वच्छता या कामांसाठी आता कंत्राटदार नेमण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. चार वर्षांसाठी कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु केली आहे. या कामासाठी पालिका दीड हजार कोटी खर्च करणार आहे. मुंबईतील सुमारे ६० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. मात्र खाजगी जागेवर असलेल्या या झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छतेसाठी कोणतीही ठोस यंत्रणा नाही. मुंबईत यापूर्वी 'स्वच्छता मुंबई प्रबोधन अभियान' या योजनेअंतर्गत झोपडपट्टीत स्वच्छतेची कामे केली जात होती. त्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत घरोघरी कचरा उचलणे, शौचालयांची स्वच्छता केली जात होती. मात्र ही कामे योग्य पद्धतीने करण्यात येत नसल्यामुळे पालिकेवर टीका होत होती. तसेच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार मुंबईत स्वच्छता अभियान राबवले जात असून त्यात झोपडपट्ट्यांमधील अस्वच्छतेवरून मुख्यमंत्र्यांनी पालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांची हजेरी घेतली होती. त्यानंतर घनकचरा विभागाने आता झोपडपट्ट्यांमधील स्वच्छतेसाठी कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेतला आहे.

घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, सार्वजनिक शौचालयांची सफाई करणे, रस्ते, गटारे, नाले, गल्लीबोळ यांच्या सफाईची जबाबदारी कंत्राटदाराला देण्यात येणार आहे. त्यात कुचराई करणाऱ्या कंत्राटदाराला जबाबदारही धरण्यात येणार आहे. या योजनेत स्वच्छतेशी संबंधित प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी, त्याखाली असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्याची जबाबदारी, त्याखाली मुकादम आणि स्वच्छता अधिकारी यांची जबाबदारी निश्चित केली जाईल. अतिरिक्त मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी या कामासाठी निविदा काढण्यास मंजुरी दिली असून लवकरच निविदा काढली जाणार आहे. चार वर्षांसाठी एकाच कंपनीला स्वच्छतेचे काम दिले जाईल. साधारण दीड हजार कोटी रुपये प्रकल्प खर्च असल्याची माहिती त्यांनी दिली. या नवीन योजनेची अमलबजावणी जानेवारी २०२४ पासून करण्याचा पालिकेच्या घनकचरा विभागाचा प्रयत्न होता. मात्र पालिकेला मसुदा आणि निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी वेळ लागला. त्यामुळे निविदा काढण्यासाठी फेब्रुवारी उजाडला आहे. या योजनेत सामाजिक संस्थांचा सहभाग न घेण्याची भूमिका पालिकेने घेतली आहे. त्यामुळे नवीन कंत्राटदार नेमून चार वर्षे मुंबईतील झोपडपट्ट्यांची जबाबदारी दिली जाणार आहे. त्यांच्यावर पालिकाही देखरेख ठेवणार असून हलगर्जीपणा केल्यास कारवाईचा बडगा उगारणार आहे. 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियाना'मुळे मुंबईकरांचे आरोग्यहितही जपले जाणार आहे.

मुंबईत दररोज सहा हजार ७०० मेट्रिक टन कचरा गोळा होतो. यापैकी साधारण एक हजार मेट्रीक टन कचऱ्याचे विकेंद्रीकरण होते. त्यानंतर राहिलेल्या पाच हजार ७०० मेट्रिक टन कचऱ्यापैकी एक हजार मेट्रीक टन कचऱ्यावर देवनारला पारंपरिक पद्धतीने प्रक्रिया केली जाते. उर्वरित चार हजार ७०० मेट्रीक टनापैकी एक हजार मेट्रीक टन कचऱ्याचे वर्गीकरण केले जाते. यातून प्लास्टिक, माती यांसारखा कचरा पालिकेने नेमलेल्या संस्था घेतात आणि त्यापासून विविध वस्तू किंवा खत तयार केले जाते.

पान १ वरून

## आमदारांनी मराठ्यांच्या बाजूने बोलावं अन्यथा..

मराठ्यांनी काय आमची पोरं बरबाद करण्याचा आणि तुम्हाला मोठं करण्याचा ठेका घेतलाय का? नेते जर उद्या उभे राहिले नाहीत तर ते मराठा विरोधी आहेत हे निश्चित होईल, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. दरम्यान, सगेसोयऱ्याबाबतची अंमलबजावणी केली नाही तर २१ तारखेला आंदोलनाची दिशा ठरणार आहे. मग बोलणंसुद्धा बंद होऊ शकतं. आजचा, उद्याचा दिवस आहे. आम्ही २० चीच वाट बघणार आहोत, २० तारखेला लक्षात येईल अंमलबजावणी करणार आहेत की नाही, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## अरविंद केजरीवाल यांचा ईडीसमोर हजर होण्यास नकार

ईडीने दाखल केलेल्या तक्रारीवर कारवाई करताना केजरीवाल यांना १७ फेब्रुवारी रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले होते. न्यायालयाने म्हटले होते की, केजरीवाल हे प्रथमदर्शनी कायदेशीररित्या त्याचे पालन करण्यास बांधील आहेत. अंमलबजावणी संचालनालयाने आपल्या तक्रारीत म्हटले आहे की केजरीवाल अबकारी धोरणाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात त्यांना पाठवलेल्या समन्सकडे दुर्लक्ष करत आहेत.

## पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी समिती गठित करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

मान्यवरांचा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शेतकरी, कष्टकरी, महिला यांच्यासह सर्वसामान्यांना न्याय देणारे हे सरकार आहे. कोरोनाकाळात पत्रकारांनी जीव धोक्यात घालून काम केले. कोरोना, पूरपरिस्थितीसह राज्यात आजवर आलेल्या अनेक संकटकालीन परिस्थितीत पत्रकारांनी खूप चांगले काम करुन आदर्श निर्माण केला आहे. पत्रकारांसाठी आम्ही कोरोनाकाळात तपासणीचे विशेष शिबीरांचे आयोजन केले होते. पत्रकार चौकस बुध्दीने, जागृत राहून समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करतात. सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम पत्रकारांनी केले आहे. शासनाच्या उणिवा दाखवतानाच समाजातील सर्वसामान्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्या त्या ठिकाणची चांगली कामे, महत्त्वाकांक्षी प्रकल्प याचेही लेखन, चित्रण पत्रकारांनी करून ते समाजासमोर आणावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी केली. पत्रकारांच्या घरकुल योजनेसाठीचा टॅक्स कमी करण्याबाबत म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात येईल. तसेच कोल्हापुरात पत्रकार भवन उभारण्यासाठी जागेचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.राजेश क्षीरसागर म्हणाले, कोल्हापूर मध्ये आजवर आलेल्या पूर परिस्थिती तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या-त्या वेळी मदतीला धावून येत सहकार्याची भूमिका बजावली आहे, त्यांच्या पुढाकारानेच कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थिती नियंत्रणासाठी कायमस्वरुपी उपाययोजनांसाठीचा निधी जागतिक बँकेकडून मिळणार आहे. प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर व कोल्हापूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुखदेव गिरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्यमंत्री व मान्यवरांचे स्वागत कोल्हापूर जिल्ह्याचे प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे व उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर यांनी केले. आभार प्रेस क्लबचे खजानिस बाबुराव रानगे यांनी मानले. सूत्रसंचालन पत्रकार समीर देशपांडे यांनी केले. मुख्यमंत्री कक्षात काम करणारे व कोल्हापूर जिल्ह्यात पूर्वी पत्रकारिता केलेले अमित हुक्केरीकर आणि प्रशांत साळोखे यांचा सन्मान प्रेस क्लबमार्फत करण्यात आला. याचबरोबर पत्रकार समीर देशपांडे यांचा सन्मान १२ वर्ष विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत अक्षरगप्पा उपक्रम राबविल्याबद्दल व पत्रकार बाबुराव रानगे यांचा सन्मान बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल केला.

## गडकोट, किल्ले हा आपला ठेवा; तो जपण्याचे काम करू : मुख्यमंत्री

त्यामुळे समाज, राज्य, देश आणि माणूस म्हणून आपण अधिक प्रगती करू, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मध्यंतरी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीदेखील नौदलाच्या कार्यक्रमात त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केले तसेच नौदलाच्या ध्वजावर शिवप्रतिमेला समाविष्ट केले ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. कुपवाडा येथे भारत पाकिस्तान सीमेवर शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. आग्र्याला देखील दिवाण-ए- आम येथे शिवाजी महाराज यांची जयंती गतवर्षीपासून साजरी करतो, असेही त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले जागतिक वारसा स्थळामध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रधानमंत्री यांनी शिफारस केली आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. जुन्नर हा पर्यटन तालुका असून बिबट सफारी विकसित करण्याचे घोषित केले आहे. येथील सुकाळवेढे, बोरघर, डुचकेवाडी, खेतेपठार मार्गे शिवजन्म भूमी आणि भीमाशंकर ही तीर्थक्षेत्रे जोडण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

**निसर्ग चक्रीवादळग्रस्तांना नुकसान भरपाईची घोषणा**

निसर्ग चक्रीवादळामुळे हिरडा पिकाचे झालेल्या नुकसान भरपाईचे १५ कोटी रुपये विशेष बाब म्हणून देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी करतानाच उपोषणकर्त्यांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले.

प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळा मुथाळने येथील विद्यार्थ्यांच्या बाल पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बालशिवाजी व जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहिली.कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते किल्ले शिवनेरी विकास मंडळाच्या माध्यमातून देण्यात येणारे पुरस्कार प्रदान करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज गौरव पुरस्कार विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. दिलीप भुजबळ यांना प्रदान करण्यात आला. शिवनेरी भूषण पुरस्कार कारगिल युद्धात विशेष कामगिरी बजावलेल्या निवृत्त ब्रिगेडियर अनिल काकडे आणि अंटार्क्टिका मोहिमेचे नेतृत्व केलेले डॉ. अरुण रामचंद्र साबळे यांना प्रदान करण्यात आला. विजय घोगरे यांनी प्रास्ताविक केले.कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके, माजी खासदार तथा म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य आशाताई बुचके, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक, पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

# 'मुरांबा'ला २ वर्ष पूर्ण! रमाने शेअर केले पडद्यामागचे अनसिन फोटो



स्टार प्रवाह वाहिनीवरील 'मुरांबा' मालिका अल्पावधीत लोकप्रिय झाली. या मालिकेतील प्रत्येक कलाकाराला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या मालिकेतून अनेक कलाकार प्रसिद्धीझोतात आले. त्यापैकी एक म्हणजे अभिनेत्री शिवानी मुंढेकर, 'मुरांबा' मालिकेत शिवानी रमा हे पात्र साकारते आहे. दरम्यान नुकतेच या मालिकेला २ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्त शिवानीने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली आहे.

शिवानी टेलिव्हिजवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर तिने मनोरंजनसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'मुरांबा' ही शिवानीची पहिलीच मालिका. या मालिकेतून तिला चांगलीच लोकप्रियता मिळाली. शिवानी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना अपडेट देत असते.

दरम्यान शिवानी इन्स्टाग्रामवर 'मुरांबा' मालिकेसंबंधित एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने मालिकेतील सहकलाकारांबरोबरचे फोटो व व्हिडीओ शेअर केले आहेत. तसेच शूटिंगदरम्यान पडद्यामागे सुरु असलेल्या मजा मस्तीचे क्षणही शेअर केले आहेत. हा व्हिडीओ शेअर करत तिने लिहिले, "जगात खूप कमी लोक आहेत ज्यांना आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते आणि मला ती मिळाली. पहिलं सगळंच special असतं पहिलं प्रेम, पहिला पाऊस, पहिली भेट असाच माझ्याही आयुष्यातला आजचा एक special दिवस "माझं पहिलं काम" मुरांबाला २ वर्ष पूर्ण झाली. मुरांबावर भरभरून प्रेम करणाऱ्या रसिक प्रेक्षकांचे कृतज्ञतेने आभार यापुढेही असेच प्रेम आमच्या मुरांबा मालिकेला व तुमच्या लाडक्या रमाला मिळत राहो हीच सदिच्छा"

शिवानीची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. अनेक चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट केल्या आहेत. या मालिकेत तिच्याबरोबर शशांक केतकर, काजल काटे, स्मिता शेवाळे, सुलेखा तळवलकर, निशाणी बोरुले, विपुल साळुंखे, यांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत.

# भारताने इंग्लंडचा ४३४ धावांनी केला मोठा पराभव



भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना आज राजकोटमध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडचा ४३४ धावांनी मोठा पराभव केला. हा भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय आहे. कसोटी इतिहासातील धावांच्या फरकाने भारताचा हा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी २०२१ मध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडचा ३७२ धावांनी पराभव केला होता. आजच्या विजयात भारतासाठी यशस्वी जैस्वाल आणि रवींद्र जडेजा यांनी मोलाचे योगदान दिले. सामन्यात इंग्लंडला ५५७ धावांचे लक्ष्य मिळाले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ १२२ धावांवर गारद झाला.

मार्क वुड वगळता इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा आकडा गाठता आला नाही. वुडने १५ चेंडूत ३३ धावा केल्या. त्याचवेळी भारताकडून रवींद्र जडेजाने पाच विकेट घेतल्या. याशिवाय कुलदीपला दोन बळी मिळाले. बुमराह आणि अश्विनला प्रत्येकी एक विकेट मिळाली. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताने २-१ अशी आघाडी घेतली आहे. हैदराबादमधील पहिली कसोटी इंग्लंडने जिंकली, तर विशाखापट्टणममधील दुसरी कसोटी भारताने जिंकली.

या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करत ४४५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा पहिला डाव ३१९ धावांवर गारद झाला. पहिल्या डावाच्या आधारे भारताकडे दुसऱ्या डावात १२६ धावांची आघाडी होती. यानंतर भारताने दुसरा डाव ४ बाद ४३० धावा करून घोषित केला. त्यामुळए एकूण आघाडी ५५६ धावांची झाली. ज्यामुळे इंग्लंड ५५७ धावांचे लक्ष्य मिळाले. या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचा डाव १२२ धावांवर आटोपला. भारताकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. कुलदीप यादवने दोन विकेट्स घेतल्या. तसेच बुमराह आणि अश्विनने एक विकेट घेतली.

# रश्मिका म्हणाली, ..आणि मी मरता मरता वाचले



नॅशनल क्रश अशी ओळख असलेली रश्मिका मंदाना ही तिच्या ANIMAL या सिनेमामुळे चांगलीच चर्चेत आहे. तसंच त्याआधी ती पुष्पा सिनेमातल्या श्रीवल्लीच्या भूमिकेमुळे घराघरांत पोहचली. याच रश्मिकाचे चाहते देशभरात आहेत. तिचं नशीब बलवत्तर म्हणून ती मरता मरता वाचली आहे. रश्मिकानेच यासंदर्भातला फोटो पोस्ट केला आहे. काळ आला होता पण वेळ आली नव्हती असं म्हणत रश्मिकाने हा फोटो आणि व्हिडीओ पोस्ट केला आहे. रश्मिकाची ही पोस्ट पाहिल्यानंतर चाहत्यांनीही चिंता व्यक्त केली आहे.


**काय आहे रश्मिका मंदानाची पोस्ट?**

रश्मिकाने अभिनेत्री श्रद्धा दास बरोबर इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो पोस्ट केला आहे. यामध्ये रश्मिका म्हणते तुमच्या सगळ्यांच्या माहितीसाठी सांगते आहे, अशा प्रकारे आज आम्ही मरता मरता वाचलो आहोत. या फोटोत रश्मिका आणि श्रद्धा दास यांचे फोटो दिसत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार रश्मिका, श्रद्धा दास आणि इतर प्रवासी जे या विमानातून प्रवास करत होते त्या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. तांत्रिक बिघाड झाल्याने हे लँडिंग करावं लागलं. हे विमान मुंबईहून हैदराबादला जात होतं. विमान हैदराबादच्या दिशेने निघालं होतं. पण तांत्रिक बिघाडामुळे या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. या फोटोमुळे रश्मिकाच्या चाहत्यांनाही धक्का बसला आहे.

रश्मिका मंदाना ॲनिमल या सिनेमात झळकली होती. त्यामुळे ती प्रसिद्धीच्या झोतात पुन्हा एकदा आली होती. अभिनेता रणबीर कपूरने रणविजय हे पात्र साकारलं होतं. तर रश्मिकाने या सिनेमात गीतांजली हे पात्र साकारलं होतं. याच रश्मिकाने आपला अनुभव सोशल मीडियावर पोस्ट केला आहे.

रश्मिका सध्या तिच्या पुष्पा २ सिनेमाच्या चित्रिकरणात व्यग्र आहे. या सिनेमात ती पुन्हा एकदा अल्लू अर्जुनहसह दिसणार आहे. सुकुमार यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. २०२१ मध्ये आलेला पुष्पा द राईज या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. तसंच ब्लॉकबस्टर सिनेमाच्या रांगेत तो जाऊन बसला आता पुष्पाचा दुसरा पार्ट पुष्पा द रुल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# अमिताभ बच्चन यांच्या अभिनय कारकिर्दीला ५५ वर्षे पूर्ण

बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन नेहमी चर्चेत असतात. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपट दिले. वयाच्या ८१ व्या वर्षातही ते अभिनय क्षेत्रात कार्यरत आहेत. अमिताभ बच्चन यांच्या अभिनय कारकिर्दीला नुकतीच ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ५५ वर्षांत त्यांनी वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या. दरम्यान, एआयने त्यांच्या ५५ वर्षांच्या अभिनय प्रवासाचा लेखाजोखा सादर केला आहे,

अमिताभ बच्चन सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय आहेत. दररोज निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. दरम्यान नुकतचं त्यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्यांनी एआयकडून बनवण्यात आलेला त्यांचा एक फोटो शेअर केला आहे. एआयने अमिताभ बच्चन यांच्या ५५ वर्षांच्या अभिनयाच्या कारकिर्दीवर आधारित फोटो बनवला आहे. यामध्ये अमिताभ बच्चन यांचे डोके कॅमेरे आणि फिल्म प्रोडक्शन मशीनने भरलेले दिसून येत आहे. हा फोटो शेअर करत त्यांनी लिहिले 'चित्रपटाच्या अद्भुत जगात ५५ वर्षे. AI ने मला याचा तपशील दिला आहे'. बिग बींची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे अनेकांनी या पोस्टवर कमेंट केल्या आहेत. तसेच सिनेसृष्टीत ५५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

अमिताभ बच्चन यांनी १९६९ साली प्रदर्शित झालेल्या 'भुवन शोम' या चित्रपटातून मनोरंजन क्षेत्रात पदार्पण केले. या चित्रपटासाठी त्यांनी व्हॉइस आर्टिस्ट म्हणून काम केले होते. त्यानंतर प्रदर्शित झालेल्या 'सात हिंदुस्थानी' चित्रपटातून त्यांनी अभिनयाला सुरुवात केली. मात्र, त्यांना खरी ओळख मिळाली ती १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आनंद' चित्रपटातून. या चित्रपटात त्यांनी साकारलेली डॉक्टर भास्कर अर्थात बाबू मोशाय हे पात्र चांगलेच गाजले. 'जंजीर' चित्रपटात त्यांनी साकारलेल्या तडफदार पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेमुळे त्यांना अँग्री यंग मॅन' म्हणून ओळख मिळाली. त्यांच्या शोले, 'दीवार', 'अमर अकबर ॲंथनी, 'मिस्टर नटवरलाल' 'लावारिस', 'मुकद्दर का सिकंदर' या चित्रपटांनी प्रेक्षकांना वेड लावले होते.

बिग बींच्या कामकाजाबद्दल बोलायचे झाले, तर लवकरच त्यांचा 'कल्की एडी २८९७' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात त्यांच्याबरोबर साऊथचा सुपरस्टार कमल हासन व प्रभास यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तसेच दीपिका पदुकोण व दिशा पटानी याही या चित्रपटात झळकणार आहेत. पौराणिक कथेवर आधारित असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नाग अश्विन यांनी केले आहे. हा चित्रपट याच वर्षी प्रदर्शित होणार आहे.

# पॅरिस ऑलिम्पिकसाठी ब्राझील अपात्र का ठरले?

ब्राझीलचा संघ २००४ नंतर प्रथमच ऑलिम्पिकसाठी पात्र ठरण्यास अपयशी ठरला आहे. ब्राझीलला पारंपरिक प्रतिस्पर्धी अर्जेंटिनाकडून पराभव पत्करावा लागला. फुटबॉलवेड्या ब्राझीलसाठी हा नक्कीच मोठा धक्का आहे. त्यापूर्वी २०२६च्या विश्वचषक पात्रता स्पर्धेतही अर्जेंटिनाने वरिष्ठ खेळाडूंचा समावेश असलेल्या ब्राझीलला पराभूत केले होते. त्यामुळे विश्वचषक पात्रता दक्षिण अमेरिका विभागात ब्राझीलचा संघ सध्या सहाव्या स्थानावर आहे. फुटबॉल विश्वातब्राझीलसाठी ही परिस्थिती नक्कीच चांगली नाही.

फुटबॉल विश्वात ब्राझील आपली आब राखून आहे. त्यांच्याइतका आक्रमक खेळ कदाचित अलीकडच्या काळात कोणी करू शकत नाही. त्यांचा कुमारवयीन खेळाडू एन्ड्रिक हे याचे उदाहरण आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एन्ड्रिक आणि नेमारने एकत्र खेळावे हे ब्राझीलच्या फुटबॉल चाहत्यांचे स्वप्न होते. मात्र एन्ड्रिकलाच संपूर्ण पात्रता स्पर्धेत फारसे यश मिळाले नाही. तो केवळ दोन गोल करू शकला. तुलनेत अर्जेंटिनाच्या विश्वचषक विजेत्या संघातील आक्रमक मध्यरक्षक थिएगो अल्माडाने पाच गोल केले. प्रमुख खेळाडूंनाच अपयश आल्याने ब्राझीलची फुटबॉलच्या मैदानावर बिकट अवस्था झाली आहे.

# साप्ताहिक राशीभविष्य

**---- मेष -----**

या सप्ताहात चंद्र राशीपासून शनी एकादश भावात स्थित असण्याने, या सप्ताहात शक्यता आहे की, व्यापारात तुम्हाला चांगला नफा होईल, यामुळे तुम्हाला काही मोठा धन लाभ करण्यात यश मिळू शकते.

**---- वृषभ -----**

या सप्ताहात आपल्या अत्यंत भावनिक स्वभावामुळे आपण आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यात अपयशी व्हाल. ज्यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांसह वाद-विवाद होणे शक्य आहे. अशा परिस्थितीत आपण आपल्या सभोवतालच्या लोकांशी भांडू नका.

**---- मिथुन -----**

या सप्ताहात जितके शक्य असेल आपल्या कामकाजातून वेळ काढून स्वतःला थोडा आराम द्या. या सप्ताहात तुमच्या बऱ्याच गोष्टींमध्ये शामिल होऊन आपले मनोरंजन करणे तुम्हाला शारीरिक विश्राम करण्यासाठी खूप सहायक सिद्ध होईल.

**---- कर्क -----**

या सप्ताहात चंद्र राशीपासुन नवम भावात राहू स्थित असण्याच्या कारणाने, या सप्ताहात योग बनत आहेत की, तुमचे काही उपकरण किंवा इलेक्ट्रॉनिक सामान किंवा कुठल्या प्रकारचे गॅझेट खराब होईल. ज्यावर तुम्हाला आर्थिक योजनेच्या बाहेर जाऊन आपले अतिरिक्त धन खर्च करावे लागू शकते.

**---- सिंह -----**

या सप्ताहात तुम्ही आपल्या पूर्व मध्ये असलेल्या निलंबित कार्यांना वेळेवर पूर्ण करण्यात यशस्वी राहाल यामुळे या राशीतील जातकांना या काळात पद उन्नती, वेतन वृद्धी आणि कार्यक्षेत्रात उच्च पद ही मिळण्याची शक्यता आहे.

**---- कन्या -----**

हा सप्ताह तुमच्या उच्च शिक्षणासाठी सामान्य पेक्षा उत्तम राहू शकते आणि बऱ्याच वेळेपासून जर तुम्ही आपल्या उच्च शिक्षणाला घेऊन काही प्रयत्न करत आहेत तर, योग बनत आहेत की, तुम्हाला त्यात या वेळी पूर्ण रूपात यश मिळू शकेल.

**---- तुळ -----**

या सप्ताहात असे प्रतीत होईल की, तुम्हाला माहिती आहे की, कोणकोणत्या लोकांना तुमच्याकडून काही अपेक्षा आहे परंतु, तुम्हाला या वेळी कुणाला ही उधार धन देण्यापासून बचाव करावा लागेल अथवा, गरज पडल्यास तुमच्या जवळ धनाचा अभाव होऊ शकतो

**---- वृश्चिक -----**

या सप्ताहात, विद्यार्थ्यांना त्यांच्या संगतीकडे सर्वात जास्त लक्ष देणे आवश्यक आहे कारण आपल्या चुकीच्या संगतीमुळे आपली प्रतिमा शाळा किंवा महाविद्यालयात खराब होण्याची शक्यता आहे..

**---- धनू -----**

मागील सप्ताहात अपचन, गुडघेदुखी, डोकेदुखी सारख्या समस्यांना घेऊन जे जातक आत्ता पर्यंत सहन करत होते ते आता या सप्ताहात आरोग्य जीवनाचे महत्व समजून त्यात सुधार करण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या प्रयत्नांना पाहून तुमच्या जवळचे लोक आनंदी होतील.

**---- मकर -----**

या सप्ताहात तुम्हाला सल्ला दिला जातो की, कामासोबतच आपल्या आरोग्याला उत्तम बनवण्यासाठी काही वेळ नक्की काढा कारण, ही वेळ तुमच्या आरोग्यासाठी उत्तम दिसत आहे.

**---- कुंभ -----**

या सप्ताहात कुटुंबातील व्यक्तीचा हसणारा स्वभाव घरातील वातावरणाला हलके आणि आनंदी बनवण्यात तुमची मदत करेल या सोबतच, या सप्ताहाच्या उत्तरार्धात अचानक कुणी दूरच्या नातेवाइकांकडून काही आनंदाची बातमी पूर्ण कुटुंबाला आनंद देईल.

**---- मीन -----**

. या सप्ताहात तुमचे कौटुंबिक जीवन अधिक अनुकूल राहण्याची शक्यता आहे कारण, तुमच्या कुंडली मध्ये ग्रहांची उत्तम स्थिती, तुमच्या कौटुंबिक जीवनासाठी सामान्य पेक्षा उत्तम दिसत आहे. ही अनुकूल स्थिती तुमच्या कौटुंबिक सदस्यांना प्रत्येक प्रकारची मानसिक समस्यांपासून निजात देऊन एकमेकांच्या प्रति त्यांचा भाईचारा वाढवण्यात मदतगार सिद्ध होईल.

# कुत्रा चावल्यानंतर सर्वात पहिलं काय करावं? या बेसिक गोष्टी जाणून घ्या!



कुत्रा चावल्यानंतर काय काळजी घेणे गरजेचे आहे हे प्रत्येकाला माहीत असणे गरजेचे आहे. कारण कुत्रा चावल्यानंतर आपल्या शरीरात अनेक वेगवेगळ्या आजार निर्माण होऊ शकतात.

कुत्रा चावल्यानंतर स्वतःचा बचाव करण्यासाठी प्रथमोपचार करणे गरजेचे आहे. तर कुत्रा चावल्यानंतर सर्वात आधी जखम पंधरा मिनिटे स्वच्छ धुवावी त्यानंतर जखमेवर मलमपट्टी बांधावी. या उपचारानंतर तुम्ही तातडीने डॉक्टरांकडे जाऊन योग्य तो उपचार आणि सल्ला घेणे गरजेचे आहे, जेणेकरून तुमचा रेबीज पासून बचाव होईल.

कुत्रा फक्त चावला तरच रेबीज होतो असं नाही तर कुत्र्याने ओरबाडल्यानंतर देखील रेबीज होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर कुत्रा चावला किंवा ओरबडला तर तातडीने डॉक्टरांकडून योग्य तो उपचार घेणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्या सूचनेनुसार लसीकरण करणे देखील गरजेचे आहे.

कुत्रा चावल्यानंतर सगळ्यात आधी झालेल्या जखमेवर निर्जंतुक पट्टी बांधणे गरजेचे आहे. झालेल्या जखमेवर मलम पट्टी करावी आणि त्यानंतर डॉक्टरांकडून योग्य तो उपचार घेणे गरजेचे आहे.

कुत्रा चावल्याने आपल्याला रेबीज होऊ शकतो. त्यामुळे कुत्रा चावल्यानंतर तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधणं गरजेचं आहे. पण आजकाल बहुतेक लोक त्यांच्या पाळीव कुत्र्यांचं लसीकरण करतात त्यामुळे रेबीज होण्याची शक्यता कमी असते. परंतु काही भटक्या कुत्र्यांमध्ये रेबीजची शक्यता असते त्यामुळे कुत्रा चावल्यानंतर आपल्याला रेबीज होऊ शकतो त्यामुळे डॉक्टरांचे योग्य तो सल्ला घेणे गरजेचे आहे.

कुत्रा चावल्यानंतर 24 तासांच्या आत इंजेक्शन घेणे फार गरजेचे असते. त्यामुळे कुत्रा चाल्ल्यानंतर पाच इंजेक्शन घेणे गरजेचे असतं. हे इंजेक्शन पहिल्या दिवशी, दुसऱ्या दिवशी, तिसऱ्या दिवशी आणि त्यानंतर सातव्या दिवशी तसेच चौदाव्या दिवशी आणि शेवटी 28व्या दिवशी दिले जाते.

# पोहे खाण्याचे अनेक आहेत फायदे



अनेकांना नाश्त्यात पोहे खायला आवडतात. भारतात अनेक ठिकाणी पोहे हे आवडीने खाल्ले जातात. पोहे हा पटकन तयार होणारा पदार्थ आहे. पण तुम्हाला माहित आहे का की पोहे खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पोह्यात जीवनसत्वे, प्रथिने, फायबर आणि लोह मुबलक प्रमाणात असतात.

**१. फायबरचा स्त्रोत**

पोह्यात फायबरचे प्रमाण पुरेसे असते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते यामुळे तुमची पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते.

**२. लवकर भूक लागत नाही**

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, पोहे खाल्ल्यानंतर आपले पोट भरलेले राहते आणि आपल्याला लवकर भूक लागत नाही. त्यामुळे आपण जास्त खाणे टाळतो.

**३. पोहे खाल्ल्याने चरबी वाढत नाही**

तुम्ही नियमितपणे नाश्त्यात पोहे खाल्ल्यास तुमची पचनसंस्था सुदृढ राहते आणि जास्त खाण्याची सवय सुटते. त्यामुळे शरीरात अनावश्यक चरबी जमा होत नाही.

**४. अधिक प्रमाणात खाल्ल्याने वजन वाढते**

रक्तातील साखरेची पातळी आणि वजन वाढवण्यासाठी पोह्याचे नियमित सेवन जबाबदार मानले जाते. कारण पोह्यात कार्बोहायड्रेट मुबलक प्रमाणात असते.

**५. मर्यादित प्रमाणात करा सेवन**

तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही रोज मर्यादित प्रमाणात पोहे खाल्ले तर त्यामुळे तुमचे वजन वाढत नाही, मात्र जास्त प्रमाणात पोहे खाल्ल्याने लठ्ठपणा येऊ शकतो.

# हिप फॅट कमी करायचं असल्यास घरीच करा अगदी सोपा व्यायाम



सूर्यनमस्कार करणे हे आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असते. तज्ज्ञ आणि डॉक्टर देखील लोकांना सूर्य नमस्कार करण्याचा सल्ला नेहमी देतात. सूर्यनमस्कारांमधली काही योगासने आहेत जी आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असतात. योगासने मेंदूपासून ते शरीराच्या वेगवेगळ्या भागांपर्यंत काम करत असतात. योगासनं केल्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण वाढते, पचनक्रिया सुधारण्यास मदत होते असे अनेक फायदे होत असतात.

जर तुम्हाला हिप फॅट कमी करायचे असेल तर सूर्यनमस्कार करणे गरजेचे आहे. सूर्यनमस्कार केल्यामुळे आपले शरीर लवचिक होते. तसेच सूर्यनमस्कार केल्यामुळे तुमचे शरीर अधिक चांगले लवचिक होण्यास मदत होते. सोबतच तुमच्या वरच्या मांड्या आणि स्नायू लवचिक होण्यास मदत होते. जेव्हाही तुम्ही सूर्यनमस्कार करता तेव्हा तुमची चरबी जळून जाते, त्यामुळे तुमचे वजन कमी होते. त्यामुळे हिप फॅट कमी करण्यासाठी सूर्यनमस्कार फायदेशीर आहे.

जर तुम्ही दररोज 12 योगासने केली तर ते तुमच्या शरीरासाठी फायदेशीर ठरते. त्यामुळे ही बारा योगासने तुम्ही नियमितपणे करणे गरजेचे आहे. यामुळे हिप फॅट कमी होण्यास मदत होते. तसंच कॅलरी बर्न देखील होण्यास मदत होते.

तुम्हालाही हिप फॅट कमी करायचे असेल तर दररोज सूर्यनमस्कार करा. यासाठी दररोज दिवसातून दोन वेळा सूर्यनमस्कार करावा. यामध्ये योगाचे 12 संच असतात जे दोनदा पूर्ण करणे म्हणजे 24 वेळा व्यायाम केला जातो. तुमच्या फिटनेसनुसार तुम्ही हा व्यायाम करा. हे दररोज केल्यामुळे शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते. त्यामुळे दररोज सूर्यनमस्कार करा.

# थंडीमध्ये उडदाचे पदार्थ का खावेत?

कडक थंडीमध्ये जेव्हा तुमचा अग्नी प्रखर असतो तेव्हा त्या अग्नीला पचायला जड असाच आहार देणे अपेक्षित असते, जे उडदाच्या सेवनाने साध्य होते. त्यात उडिद पचायला अधिक वेळ लागतो. त्यामुळे एकदा उडदाचे पदार्थ खाल्ले की बराच वेळ अन्न मिळाले नाही तरी चालते, जे हिवाळ्यात पुन्हा-पुन्हा भूक लागत असताना उपकारक होते. याशिवाय उडिद उष्ण गुणाचे असल्याने शरीरात थंडी कमी करून उष्णता वाढवण्यास मदत करतात. उडीद हे मांसाप्रमाणे पचायला जड आणि मांसाप्रमाणेच शरीराला शक्ती देणारे असतात (माषो मांसवर विहार) असे आयुर्वेदाने सांगितले आहे. वास्तवात उडीद हे मांसाप्रमाणेच पौष्टीक आहेत.मांससेवनाने जशी व जितकी उर्जाशक्ती मिळते, तशी व तितकीच उर्जाशक्ती उडदानेही मिळते, हेच पूर्वजांना सुचवायचे आहे. प्रत्यक्षातही १०० ग्रॅम उडदामधुन जवळजवळ ३५० कॅलरी( उष्मांक) मिळतात.

## अटल सेतूवरून 'शिवनेरी' धावणार



**मुंबई :** शिवडी ते नाव्हाशेवा दरम्यान नव्या 'अटल सेतू'वरून एसटीची शिवनेरी बस सुरू करण्यात येणार आहे. पुणे ते मंत्रालय आणि स्वारगेट ते दादर शिवनेरी बसमध्ये पूर्ण क्षमतेने प्रवासी बसतात. त्यामुळे या प्रवाशांचा वेळ वाचवण्यासाठी अटल सेतूवरून शिवनेरी बस मुंबई गाठणार आहे. त्यामुळे एवढ्याच तिकीट दरात पुणे-मुंबई-पुणे शिवनेरी बसचा प्रवास अधिक वेगवान होईल.

एसटी महामंडळाने प्रायोगिक तत्त्वावर २० फेब्रुवारीपासून पुणे ते मंत्रालय (सकाळी ६.३० वाजता ) व स्वारगेट-दादर (सकाळी ७ वाजता ) या दोन शिवनेरी बस सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या बस पुणे येथून निघून थेट पनवेल नाव्हाशेवा, शिवडी मार्गे मंत्रालय/दादर येथे पोहोचतील. परतीचा प्रवास सकाळी ११ व दुपारी १ वाजता याचमार्गे अनुक्रमे मंत्रालय व दादर येथून निघतील.

# किकवारी येथे लष्करी जवान राकेश काकुळते यांना अखेरचा निरोप

**सटाणा :** अमर रहे, अमर रहे, राकेश काकुळते अमर रहे अशा घोषणा देत आज बागलाण तालुक्यातील किकवारी गाव व पंचक्रोशीतील नागरिकांनी वीर जवान राकेश काकुळते यांना साश्रुनयनांनी अखेरचा निरोप दिला.येथील शेतकरी गोकुळ नामदेव काकुळते यांचा सुपुत्र असलेला राकेश हा २००४ मध्ये भारतीय लष्करात दाखल झाला होता. बेळगाव येथील मराठा बटालियन मध्ये खडतर असे प्रशिक्षण घेऊन भारतीय लष्करी सेवेत दाखल झालेल्या राकेशने जम्मू काश्मीर सह देशातील अनेक भागात देशसेवा केली होती. सुरत येथे कर्तव्यावर असलेल्या राकेश काकुळते (३७)याला हृदयविकाराचा झटका आल्याने त्याचा मृत्यू झाला. राकेशच्या निधनाचे वृत्त किकवारी व परिसरात आल्यानंतर संपूर्ण किकवारी गाव आणि परिसराने राकेश राहत



असलेल्या निवासस्थानी गर्दी केली होती. रविवारी सकाळी ११ च्या दरम्यान सुरत येथून रुग्णवाहिकेने राकेशचे पार्थिव किकवारी गावात आणण्यात आले. यानंतर देवळाली आर्टलरी सेंटर येथून आलेल्या लष्करी वाहनातून राकेशच्या पार्थिव देहाची मिरवणुक गावातून काढण्यात आली. वीरजवान राकेश वर गावाशेजारील मोकळ्या पटांगणात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी शासनाच्या वतीने बागलाणचे आमदार दिलीप बोरसे यांनी वीर जवान राकेश यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले. प्रशासनाच्या वतीने उपविभागीय प्रांत अधिकारी बबनराव काकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, तहसीलदार कैलास चावडे ,पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार, यांनी पुष्पचक्र अर्पण केली तर लष्कराच्यावतीने देवळाली आर्टलरी सेंटर चे मेजर नकुल गोस्वामी यांनी पुष्पचक्र अर्पण केले.यावेळी सुभेदार राम कीर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली देवळाली येथून आलेल्या बारा लष्करी जवानांनी शहीद काकुळते यांना मानवंदना देत श्रद्धांजली अर्पण केली. तर महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने नाशिक येथील ग्रामीण पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक नारायण कोरडे व पोलीस हवालदार योगेश नाईक यांच्या पथकाने मानवंदना व सलामी दिली.

## आशिष शेलार यांनी घेतली राज ठाकरे यांची भेट





**मुंबई :** भाजप नेते आशिष शेलार यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची आज (सोमवार) भेट घेतल्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. शेलार यांनी राज ठाकरे यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल दीड तास चर्चा झाली. या भेटीचं कारण अद्याप गुलदस्त्यात आहेत, मात्र गेल्या अनेक दिवसांपासून मनसे महायुतीत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरू आहे. या संदर्भात ही चर्चा असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

आशिष शेलार आणि राज ठाकरे यांच्यामध्ये तब्बल दीड तास चर्चा झाली. चर्चा नेमकी कशावर झाली याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाहीये. मात्र, या भेटीनंतर चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अनेकदा राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. त्यानंतर आता आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. दरम्यान, यावेळी मनसे देखील लोकसभेची निवडणूक लढवणार आहे. त्या दृष्टीने पक्षाची जोरदार तयारी सुरू आहे. मनसेकडून पुणे, नाशिक या शहरांवर लक्ष केंद्रीय करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी राज ठाकरे यांनी नाशिकचा दौरा केला होता. मनसे देखील लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने राज्यात लोकसभा निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे.

## जे. पी. नड्डा यांच्या भाजपा अध्यक्षपदाला मुदतवाढ

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांचा अध्यक्ष म्हणून कार्यकाल जून २०२४ पर्यंत वाढवण्यात आला. नड्डा यांचा भाजपा अध्यक्ष म्हणून कार्यकाळ संपला होता. भाजपा राष्ट्रीय परिषदेच्या प्रगती मैदानस्थित भारतमंडपममध्ये सुरू असलेल्या द्विदिवसीय अधिवेशनात नड्डा यांच्या कार्यकाळाला जून २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. अध्यक्ष म्हणून पक्षाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा अधिकारही नड्डा यांना देण्यात आला. मात्र या निर्णयांवर नंतर भाजपा संसदीय मंडळाकडून त्यांना शिक्कामोर्तब करून घ्यावे लागणार आहे. नड्डा यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवण्यात आल्याची घोषणा मागील महिन्यातच करण्यात आली होती, आज त्या निर्णयावर राष्ट्रीय परिषदेने औपचारिक शिक्कामोर्तब केले. नड्डा यांचा कार्यकाळ वाढवण्याची घोषणा करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, नड्डा यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात आम्ही उत्तर प्रदेशात दुसऱ्यांदा विजय मिळवला, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये आमच्या जागा आणि मतांची टक्केवारी वाढली, महाराष्ट्रात रालोआने बहुमत मिळवत सरकार बनवले, तसेच गुजरातमध्ये लक्षणीय विजय मिळवल्याचे सांगितले होते. २०१९ मध्ये नड्डा यांची भाजपाचे कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. २०२० मध्ये त्यांची पक्षाचे नियमित अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. लोकसभा निवडणुका असल्यामुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला मुदतवाढ देण्यात आली. जून २०२४ नंतर भाजपाला आपला नवीन अध्यक्ष निवडावा लागणार आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीपूर्वी चंदीगडचे महापौर मनोज सोनकर यांचा राजीनामा

**चंदीगड :** चंदीगड महापालिका निवडणुकीत महापौर झालेले भाजपचे मनोज सोनकर यांनी रविवारी रात्री राजीनामा दिला आहे. ३० जानेवारी रोजी झालेल्या चंदीगड महापालिका निवडणुकीत गडबड करून चुकीच्या पद्धतीने महापौर निवड झाली, असे आरोप झाले होते.मनोज सोनकर यांचा हा राजीनामा सर्वोच्च न्यायालयात सोमवारी या प्रकरणी सुनावणी होण्यापूर्वीच आला आहे.दरम्यान, आम आदमी पक्षाच्या चंदीगडच्या नगरसेवक पूनम देवी, नेहा मुसावत, गुरचरण काला यांनी चंदीगड भाजप नेते विनोद तावडे यांच्या उपस्थित भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्याचबरोबर काँग्रेसचे दोन नगरसेवकही भाजपच्या संपर्कात आहेत. सर्वोच्च न्यायालयात उद्या होणाऱ्या सुनावणीत पीठासीन अधिकारी



### सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दात फटकारले होते

चंदीगड महापौर निवडणुकीदरम्यान जे काही घडले ते लोकशाहीची चेष्टा असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने आम्ही लोकशाहीची अशी हत्या होऊ देणार नाही, असे म्हटले होते. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पीठासीन अधिकारी अनिल मसिह यांना पुढील सुनावणीच्या तारखेला १९ फेब्रुवारी रोजी हजर राहण्यास सांगितले होते.

अनिल मसिहही हजर राहणार आहेत. महापौर निवडणुकीतील पीठासीन अधिकाऱ्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यात ते बेकायदेशीर ठरवणाऱ्या नगरसेवकांच्या मतांवर मार्किंग करताना दिसत होते.काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने चंदीगड महानगरपालिकेची निवडणूक युतीने लढवली होती. या गडबडीच्या विरोधात आम आदमी पक्ष सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्यानंतर न्यायालयाने चंदीगड प्रशासनाला फटकारले आणि प्रकरणाची पुढील सुनावणी १९ फेब्रुवारी रोजी निश्चित केली. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होण्यापूर्वीच महापौर सोनकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

## वाघोली पोलीस चौकीसमोर पेटवून घेतलेल्या तरुणाचा मृत्यू

**पुणे (विकास प्रजापती) –** काही दिवसांपूर्वी रोहिदास जाधव नामक तरुणाने वाघोली पोलीस चौकी समोरच स्वतःला पेटवून घेतले होते. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. काल (दि.१९) अखेर त्याचा मृत्यू झाला आहे. रोहिदास राहत असलेल्या ठिकाणी तेथील अन्य व्यक्तींकडून त्याला मानसिक त्रास दिला जात होता. त्या व्यक्तींशी गेल्या अनेक दिवसांपासून त्याचे वाद सुरू होते. अशात त्याच व्यक्तींकडून काही दिवसांपूर्वी त्याला मारहाण झाली होती. झालेल्या प्रकाराची तक्रार करण्यासाठी तो वाघोली पोलीस चौकीत गेला.

रोहिदासने संबंधित व्यक्तींविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यावर पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला. मात्र त्यांच्यावर कारवाई केली नाही. कारवाईला होत असलेला उशिर पाहून रोहिदास आणखी संतापला. यातच लोणीकंद





पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या वाघोली पोलीस चौकी समोर त्याने स्वतःवर डिझेल टाकून पेटवून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. यामध्ये तो ९० टक्के भाजला आहे. त्याला वाघोली येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथून पुणे येथील रुग्णालयात हलविण्यात आले. अखेर त्याचा मृत्यू झाला आहे. या संपूर्ण प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दखल घेत लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची तडकफडकी बदली केली होती. याच प्रकरणी २ पोलीस कर्मचारी निलंबित झाले आहेत.

## सहाय्यक पोलीस आयुक्तासाठी १ लाखांची लाच घेणारा लाचलुचपत प्रतिबंधकच्या सापळ्यात

**पुणे :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या देहूरोड विभागातील लोकसेवक, सहायक पोलीस आयुक्त मुगुटलाल पाटील यांना १ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. खासगी व्यक्तीकडून पाटील यांनी एकाकडे ५ लाख रुपये मागितले होते.ओंकार जाधव असे पाटील यांच्या हस्तकाचे नाव आहे. तो पाटील यांचा नातेवाईक आहे. पुण्यात जहांगीर हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये त्याला पकडण्यात आले.

१७ फेब्रुवारी रोजी त्याला लाचेचे १,००,००० रुपये घेताना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले. तक्रारदार यांच्याविरुद्ध कात्रज-कोंढवा बायपास रोड येथील जागेसंबंधात फसवणुकीचा तक्रार अर्ज केला गेला होता. अर्जाची चौकशी सहाय्यक पोलीस आयुक्त मुगुटलाल पाटील यांच्याकडे सुरु होती. फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व मदत करण्यासाठी ५,००,००० रुपये लाचेची मागणी पाटील यांच्या सुचनेवरून ओंकार जाधव याने केली.याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली होती. ओंकार जाधव यास ताब्यात घेण्यात आले असून, कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक नितिन जाधव तपास करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## नागरिकांच्या सहकार्याने गडचिरोलीतील नक्षलवाद संपवू : पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला

### वांगेतुरी पोलीस स्टेशन व गर्देवाडा पोलीस मदत केंद्रास भेट

**गडचिरोली :** महाराष्ट्र राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी आज गडचिरोली पोलिस दलास भेट दिली. यावेळी त्यांनी पोलिस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथील शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली व शौर्यस्थळास भेट दिली. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये नव्याने स्थापन झालेल्या वांगेतुरी पोलिस स्टेशनला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

यावेळी उपस्थित अधिकारी व अंमलदार यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर जानेवारीमध्ये उपविभाग हेडरी अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या गर्देवाडा पोलिस मदत केंद्रात पोलिस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून आयोजित केलेल्या महाजनजागरण मेळाव्यात पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांचे हस्ते व राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त शिरीष जैन, विशेष पोलिस महानिरीक्षक संदिप पाटील, पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत महाजनजागरण मेळाव्यात हजर नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड, आभा कार्ड, ई-




श्रम कार्ड व इतर शासकिय कागदपत्रे, स्प्रे पंप, स्वयंपाकासाठी लागणारी मोठी भांडी, मच्छरदानी, ब्लँकेट, लोवर-टीशर्ट, मोठे बल्ब, महिलांना साड्या व चप्पल, तसेच शालेय विद्यार्थ्यांना सायकल, पेन, नोटबुक, क्रिकेट किट, व्हॉलीबॉल व नेट, कपडे, कंपास, चॉकलेट, बिस्कीट आदी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधतांना शुक्ला म्हणाले की, शिक्षणाच्या जोरावर आदिवासी समाजातील महिला या देशाच्या राष्ट्रपतीपदी देखील येऊ शकतात. आजपर्यंत माओवाद्यांच्या प्रभावामुळे हा परिसर विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिला होता. मात्र आता नवीन पोलिस मदत केंद्राच्या स्थापनेमुळे येथील नागरिक भयमुक्त होऊन विकासाच्या प्रवाहात येतील. पोलिस दादालोरा खिडकी सारख्या उपक्रमातून दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना विविध शासकिय योजनांचा लाभ मिळत आहे. त्यामुळे येत्या काळात येथील आदिवासी बांधवांच्या मदतीनेच आम्ही माओवाद संपवू. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटिबध्द असुन जनतेने माओवाद्यांच्या भुलथापांना बळी पडु नये, असे म्हणाले.यावेळी पोलिस मदत केंद्र सुरजागड येथील पोलिस अंमलदार निवासस्थानाचे व भोजन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपमुख्यालय प्राणहिता येथे भेट देऊन सर्व पोलिस अधिकारी/अंमलदार यांचा दरबार घेऊन समस्या जाणून घेतल्या.

यावेळी त्यांनी म्हटले की, गडचिरोली पोलिस दलाच्या सी-६० पथकाचा अभिमान असून, सी-६० पथकातील जवानांनी माओवादाविरुद्धच्या शिल्लक असलेल्या शेवटच्या लढाईवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे, असे म्हणाले. त्यानंतर सी. टी. सी. किटाळी येथे भेट देऊन येथील प्रशिक्षणार्थी बॅरेक, टॅक्टीकल फायरिंग रेंज कंट्रोल रुम व फायरबट क्र. १ चे नुतनीकरण उद्घाटन केले. त्यानंतर माओवादविरोधी अभियानामध्ये वापरलेल्या शस्त्रास्त्रे, ड्रोन व विविध प्रकारच्या युद्धनितीबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती घेतली.

## राष्ट्रीय सहकार साखर संघाच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन पाटील

**मुंबई :** पन्नास वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपाने राष्ट्रीय साखर संघावर वर्चस्व मिळवले असून, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या



अध्यक्षपदी भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी गुजरातचे केतन भाई पटेल यांची बिनविरोध निवड झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रात उसाचे क्षेत्र जास्त आहे. येथे साखर कारखानदारीचे जाळे मोठ्या प्रमाणात विणले गेले आहे. येथील राजकीय क्षेत्रावर सहकाराच्या राजकारणाचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वपूर्ण संस्थेच्या कारभाराची सूत्रे पाटील यांच्या हाती जाण्याला एक वेगळे महत्त्व आहे.


महासंघाचे कार्यालय नवी दिल्ली येथे असून देशातील साखर उद्योगाला मार्गदर्शन करणे, तसेच साखर उद्योगांपुढील अडचणी केंद्र सरकारकडे मांडणे, केंद्राकडे पाठपुरावा करून साखर कारखानदारांच्या प्रश्नांना तडीस लावण्याचे काम महासंघाच्या माध्यमातून केले जाते.हर्षवर्धन पाटील हे सध्या कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. त्याचप्रमाणे नीरा भीमा सहकारी साखर कारखाने देखील त्यांच्याकडे आहे.

### ४ कोटींचे मेफेड्रॉन जप्त; सुत्रे हाती घेतल्यापासूनची सर्वात मोठी कारवाई

# पुणे पोलीस आयुक्तांचा अंमली पदार्थ तस्करांना मोठा दणका

**पुणे (राकेश लोंढे) –** पुण्यात ड्रग्स तस्करांचे आंतरराष्ट्रीय रॅकेट उघडकीस आले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने मोठी कारवाई करत तब्बल ३ कोटी ५८ लाख रुपये किंमतीचे मेफेड्रॉन (एमडी) ड्रग्ज जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी ३ ड्रग्ज तस्करांना अटक केली.अंमली पदार्थासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज पत्रकार परिषदेत माहिती सांगितली. अमितेश कुमार यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतरची ही सर्वात मोठी कारवाई आहे.

ही कारवाई शहरातील मध्यभागी असणाऱ्या सोमवार पेठ परिसरात रविवारी रात्री करण्यात आली. यामुळे ड्रग्ज तस्करांचे पुण्यातील रॅकेट उघडकीस आले आहे. पोलीस रेकॉर्डवरील आरोपी वैभव पिंट्या भारत माने, त्याचा ड्रायव्हर अजय आमरनाथ करोसिया (वय ३५ रा. पुणे), हैदर नुर शेख (रा. विश्रांतवाडी, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. गुन्हे शाखा युनिट एकचे पथक रविवारी रात्री पेट्रोलिंग करत असताना पोलीस



पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार

अंमलदार विठ्ठल साळुंखे यांना माहिती मिळाली की, सोमवार पेठेत एक पांढऱ्या रंगाची इर्टिगा (एमएच १२ युजे ४०८१) कार मध्ये दोन जण बसले असून त्यापैकी पोलीस रेकॉर्डवरील आरोपी वैभव उर्फ पिंट्या माने हा असून त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने वैभव माने याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक कोटी रुपये किंमतीचे ५०० ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्ज जप्त केले. दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता हैदर शेख याने दिल्याचे समजले.हैदर शेख याचा शोध घेण्यासाठी पाच पथके रवाना करण्यात आली. पोलिसांनी शेख याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडे एक कोटी किंमतीचे क्रिस्टल पावडर स्वरुपातील ५०० ग्रॅम एमडी हा अंमली पदार्थ आढळून आला. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता विश्रांतवाडी परिसरातील एक पत्र्याचे गोडाऊन असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी गोडाऊनची तपासणी केली असता. तेथे ३०० पोती मिळून आली. त्यामध्ये एमडी ड्रग्ज आहे का याची तपासणी पोलीस करीत आहेत. हैदर शेख याच्याकडे चौकशी केली असता एमडी ड्रग्ज एका परदेशी व्यक्तीने विक्री करण्यासाठी दिल्याचे सांगितले.

आरोपी हैदर शेख याच्या ताब्यातून एक कोटी रुपयांचे ५०० ग्रॅम एमडी ड्रग्ज, मोबाईल, सॅक जप्त करण्यात आली. हैदर शेख याच्या ताब्यातून एक कोटी रुपयांचे ५०० एमडी ड्रग्ज, मोबाईल, सॅक, गोडावुनमधून दीड कोटी रुपयांचे ७५० ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्ज, इलेट्रॉनिक वजन काटा, तसेच वैभव उर्फ पिंट्या माने याच्याकडून एक कोटी रुपयांचे ५०० ग्रॅम एमडी ड्रग्ज, सॅक, दोन मोबाईल, ८ लाख रुपये किंमतीची इर्टिगा कार जप्त केली आहे. दोघांकडून ३ कोटी ५८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त गुन्हे अमोल झेंडे , सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ सुनिल तांबे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-२ सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद, अजय वाघमारे, राजेंद्र लांडगे , विनायक गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक बाबर, गायकवाड आदींनी केली.अमितेश कुमार यांनी सांगितले की ड्रग्स फ्री पुणे हे प्राधान्य आहे , अशी घोषणा आम्ही केली होती.बार, पब्स रात्री दीड वाजल्यानंतर सुरू ठेवल्यास कठोर कारवाई होणार आहे.

# ठाणे जिल्ह्यातील शहरांपुढे भविष्यातील पाण्यासाठी 'चिंता'

**कल्याण :** मुंबई महानगर क्षेत्रात ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, अंबरनाथ या शहरांचे गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले. येथे आणखी मोठमोठ्या गृहप्रकल्पांची कामे होत असल्याने आगामी काळात शहरांची लोकसंख्या वाढणार आहे. असे असताना या शहरांना पाणी पुरवठा करणारे स्रोत मात्र मर्यादितच असून त्यामध्ये वाढ करण्याचे प्रयत्न होताना दिसत नाही. जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे समितीने सुचविलेल्या उपाययोजनांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून भविष्यात या शहरांना जलचिंता सतावणार असल्याची भीती तज्ज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे.

मुंबई महानगरातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, अंबरनाथ शहराचे गेल्या काही वर्षांत महत्व वाढले आहे. या शहरांमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पालिकांमार्फत विविध पायाभूत प्रकल्प उभारले जात आहेत. या शहरांचे झपाट्याने नागरीकरण होत असताना दुसरीकडे या शहरांना पाणी पुरवठा करणारे स्रोत मात्र मर्यादित असून त्यामध्ये बारवी, भातसा, आंध्रा या धरणांचा समावेश आहे. आंध्रा, बारवी धरणातून दररोज उल्हास नदीच्या माध्यमातून १२३९ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा ठाणे परिसरातील शहरांना केला जातो. शाळा, औद्योगिक विभाग, ग्रामपंचायती यांना सुमारे ८० दशलक्ष लीटर पाणी पुरवठा केला जातो.

पाण्याच्या मंजूर कोटयातूनच नवीन वसाहतींना पाणी पुरवठा दिला जात असून यामुळे जुन्या आणि नवीन वसाहतींमध्ये पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने तिथे टंचाईची समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. नवी मुंबई परिसराचे झपाट्याने नागरीकरण होत आहे. या नवीन वस्तीला उपलब्ध जलस्रोतांमधून एमआयडीसी, पालिकांकडून शासन आदेशाने पाणी पुरवठा केला जात आहे. पाण्याच्या या सहानुभूतीच्या वाटपामुळे मूळ शहरातील जुन्या वस्तीला कमी दाबाने पाणी पुरवठा सुरू झाल्याने येत्या काळात पाण्यावरून या भागात असंतोषाची दरी निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ठाणे पलिकडील शहरांमधील भविष्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे यांची १९९८ मध्ये समिती नेमली होती. समितीने एमएमआर क्षेत्रातील ठाणे, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, बदलापूर, उल्हासनगर परिसरातील गावांचा भविष्यकालीन पाणी प्रश्न सोडविण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील काळू, शाई, पोशीर, पालघर जवळील पिंजाळ, सुसरी धरणे होणे महत्त्वाचे आहे, असे अधोरेखित केले होते. या भागाची लोकसंख्या नजिकच्या काळात सुमारे दीड कोटीहून अधिकचा टप्पा गाठणार आहेत. या वाढत्या वस्तीची १५२९ एमएलडी पाण्याची गरज भागविण्यासाठी या धरणांची कामे विहित टप्प्यात पूर्ण झाली तरच विस्तारित भागातील पाण्याची गरज शासन भागवू शकेल, असे समितीने अहवालात म्हटले होते. २०१६ पर्यंत या प्रस्तावित धरणांचे महत्त्वाचे टप्पे बांधून पूर्ण केले जाणे अपेक्षित होते. परंतु निधी, भूसंपादन, स्थानिक विरोध या कारणांमुळे शासनाने चितळे समितीच्या अहवालाकडे दुर्लक्ष केले.